

# चले जाव आंदोलन

## बा बा राजेघोरपडे



करेंगे या मरेंगे

Do or Die

महात्माजींनी आपल्या दोन
मिनिटांच्या भाषणात हा संदेश दिला.
अख्खा भारत सळसळून उठला.

एवढे तीव्र आंदोलन की

538 ठिकाणी गोळीबार झाले

९४० ठार, सोळाशे जखमी

अनेक ठिकाणी लष्कराने बॉंबफ़ेक
केली. त्यातही अनेक ठार व जखमी

आणि संतापाने पेटलेल्या जनतेने

२५० स्टेशने जाळली. रूळ उखडले.

५०० पोस्ट ऑफ़िसेस आणि असंख्य सरकारी कार्यालयांची नासधुस केली

पोलीस स्टेशन्सही यातून सुटली नाहीत.

अनेक पोलिस अधिकाऱ्यांचे बळी गेले. मॅजिस्ट्रेट आणि तहसिलदारही सुटले नाहीत. सरकारला हालचाल करणे अवघड केले.

आंदोलकांनी देशात जागोजागी प्रतिसरकारे स्थापन केली. तिथला सर्व कारभार हाती घेतला.

जबाबदारीने. सामर्थ्याने.
आत्मविश्वासाने.

एक नवे पर्व सुरू झाले.

बॅंका, शस्त्रे लुटली.

प्रति सैन्य स्थापन झाले.


महाराष्ट्रात पत्री सरकार स्थापन
झाले.

सरकारी दडपशाही वाढत होती.
हजारो कार्यकर्ते तुरुंगात. लाखो
भूमिगत. या भूमिगत क्रांतिकारकांनी
गोऱ्यांना सळो कि पळो करून
सोडले.

जागतिक इतिहासातील एका महान पर्वाचा, ऑगस्ट क्रांती दिनाचा हिरक महोत्सव सुरू होत आहे.

महाराष्ट्रातील पत्री सरकारच्या सत्यकथांचे हे छोटेसे पुस्तक वाचलेच पाहिजे.

ई साहित्य प्रतिष्ठान


ULAMI










नाना पाटील यांचे कुटुंबीय : नाथाजी लाड व त्यांची पत्नी, आई आणि जावई भगवानराव मोरे





क्रांतिसिंह नाना पाटील यांनी स्थापन केलेल्या प्रतिसरकार आणि तुफान सेनेची इंग्रजांनी एकच धास्ती घेतली होती. या तुफान सेनेच्या संचलनाचे दुर्मिळ छायाचित्र.



हे पुस्तक प्रताधिकार मुक्त असून विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध आहे.

आपण हे स्वतः वाचून इतरांनाही फ़ॉरवर्ड करू शकता.

ई साहित्य प्रतिष्ठान ची पुस्तके विनामूल्य असतात.


ती मिळण्यासाठी लिहा

esahity@gmail.com

भेट द्या

www.esahity.com

# चलेजाव आंदोलन



लेखक

बा. बा. राजे घोरपडे

2८

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

# चलेजाव आंदोलन


— लेखक —

श्री. बा. बा. राजे घोरपडे



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

प्रथमावृत्ती–ऑक्टोबर १९८८.

प्रकाशक :
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
नवीन प्रशासन भवन, मुंबई–४०० ०३२.

© प्रकाशकाधीन

मुद्रक :
विकास म्हात्रे
रचना प्रिंटर्स,
राऊत इंडस्ट्रीयल इस्टेट, माहीम, मुंबई–४०० ०१६.

किंमत रुपये १०/–

# अनुक्रमणिका


१] चळेजाव आंदोलन ... ... ५

२] 'उघड बंडाचा' पसरलेला वणवा ... ... ९

३] प्रतिसरकारची स्थापना ... ... ११

४] 'चलेजाव' चळवळीचा ताळेबंद ... ... १५

५] काँग्रेसचा जन्म ... ... १८

६] होमरूल लीगचे यशापयश
व जातीय चळवळी ... ... ३५

७] इंडियन नॅशनल लिबरल फेडरेशन ... ... ४१

८] काँग्रेसचा आदेश शिरोधार्य मानणे ... ... ४७

९] भूमिगतांचे दिव्य ... ... ६४

# चले जाव आंदोलन

## चलें जाव आंदोलनास कारणीभूत परिस्थिती

१) क्रिप्स वाटाघाटी फिसकटल्यामुळें देशात नैराश्याची व वैफल्याची भावना पसरली. युद्धाचे भीषण पाश आवळले जात असूनही ब्रिटिश राज्यकर्ते हिंदी लोकांच्या हाती सत्ता सोपविण्यात तयार नाहीत हे क्रिप्स वाटाघाटी फिसकटल्याने सिद्ध झाले. ब्रिटिशांचे हृदय परिवर्तन करण्यासाठी वैयक्तिक सत्याग्रह अपुरा पडला. त्यापेक्षा आणखी काही केले पाहिजे असे काँग्रेस नेत्यांना वाटू लागले.

२) ब्रिटिशांचे भारतावर राज्य आहे म्हणून जपानने भारताकडे आगेकूच केली आहे. जपानच्या वाढत्या आक्रमणास ब्रिटिश राज्यकर्ते रोखू शकत नाही, असे भारतीयांना दिसून आले. भारतास स्वातंत्र्य दिल्यास जपानला भारतावर आक्रमण करण्याचे कारण वाटणार नाही. आक्रमण मागे घ्यावे अशी भारतीय नेते जपानला विनंती करतील, त्याप्रमाणे जपान वागेल पण त्याप्रमाणे जपानने न केल्यास स्वतंत्र भारतातील सर्व राष्ट्रीय सामर्थ्य एकत्र येऊन जपानला तोंड देतील. भस्मासूराची वक्र दृष्टी भारताकडे वळण्यास कारण म्हणजे ब्रिटिशांचे राज्य ! ब्रिटिशांचे राज्य हे सर्व दोषांचे मूळ कारण ! 'भारत सोडून चालते व्हा' असे ब्रिटिशांना सांगणे नैतिकदृष्टया समर्थनीय ठरते असे म. गांधीना वाटले. म्हणून म. गांधींनी १९ एप्रिल १९४२ पासून 'ब्रिटिशांनी वेळीच भारत सोडून जाणे भारताच्या व ब्रिटनच्या हिताचे आहे' असे प्रतिपादन करावयास सुरुवात केली.

३) ब्रिटिश भारताचे संरक्षण करण्यास असमर्थ आहेत. सिंगापूर, मलाया, ब्रह्मदेशातून माघार घेताना ब्रिटिशांनी तेथील जनतेला जपान्यांच्या दयेवर सोडून दिले. तीच गोष्ट भारतात होऊ नये म्हणून ब्रिटिशांनी वेळीच भारत सोडून जावे व भारत जपान्यांच्या ताब्यात देण्याऐवजी भारतीयांच्या ताब्यात देऊन जावे.

४) 'रंगूनमध्ये जपानी आक्रमणाचे वेळी ब्रिटिश राज्यकर्त्यांनी आपली जबाबदारी पार पाडली नाही. बहुसंख्य जनतेस शत्रूच्या दयेवर सोपवून युरोपियन लोकांना सुरक्षिततेसाठी तेथून हलविले' असा ठराव अलाहाबादच्या ऑल इंडिया काँग्रेस कमिटीने सम्मत केला (मे १९४२) पण तो ठराव प्रसिद्ध करण्यास सरकारने मनाई केली. पोलिसांनी अलाहाबादला काँग्रेस कार्यावर घेरा टाकून कागदपत्र ताब्यात घेतले. वांशिक भेदभावानुसार युरोपीयनांची कातडी बचावण्याची प्रवृत्ती पाहून हिंदी लोकांना राग आला व त्यांनी ब्रिटिशांना 'चले जाव' म्हटले.

५) युद्ध काळात शत्रूराष्ट्रानी ब्रिटिशांविरूद्ध प्रचारासाठी भारतीयांचे साहाय्य घेतले. नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी बर्लिनच्या आझाद हिंद रेडिओवरून ब्रिटिशविरोधी प्रचार सुरू केला. त्यामुळे भारतीयांत ब्रिटिशांविरोधी भावना निर्माण होऊन ते ब्रिटिशांना 'चले जाव' म्हणण्यास प्रवृत्त झाले असावे.

६) महायुद्धकाळात महागाई भरमसाट वाढून जनतेचे दैनंदिन जीवन असह्य बनले होते. ह्यातून सुटका करण्यासाठी एक मार्ग आढळला व तो म्हणजे भारतातून ब्रिटिशांनी निघून जावे हा.

## 'महात्माजींचा आदेश'

म. गांधीनी हरिजन वृत्तपत्रातून चले जाव संबंधीचा दृष्टिकोन मांडला प्रेस्टन ग्रोव्हर, लुई फिशर इ. जागतिक कीर्तीच्या वृत्तपत्रकारांना व वार्ताहरांना मुलाखती दिल्या व मार्शल चँग-कै-शेक, प्रे. रुझवेल्ट यांना पत्रे लिहून आपला 'भारत छोडो' संबंधीचा दृष्टीकोन स्पष्ट केला. वर्धा येथे काँग्रेस वर्किंग कमिटीच्या बैठकीत (१४ जुलै) चले जाव धमकीचा ठराव. पास झाला व ऑल इंडिया काँग्रेस कमिटीने मुंबईच्या बैठकीत (८ ऑगस्ट १९४२) ठरावास मान्यता दिली. वर्धाच्या काँग्रेस वर्किंग कमिटीत ठराव पास झाल्यावर ठराव स्पष्ट करून सांगण्यासाठी ब्रिटिश लष्करी अधिकाऱ्याची कन्या मिस् स्लेड (कु. मिराबेन) दिला गव्हर्नर जनरलकडे पाठविले. पण ग. ज. ने भेटावयाचे नाकारले. तेव्हा वर्ध्याच्या ठरावात

अहिंसात्मक लढ्याची धमकी दिली होती तर मुंबईच्या ऑ. इं. काँ. क. च्या बैठकीत अहिंसात्मक लढ्यास मान्यता दिली.

'लढ्यास मार्गदर्शन करण्यासाठी काँग्रेस समित्या कदाचित अस्तित्वात राहाणार नाहीत. काँग्रेसने दिलेले आदेश जनतेपर्यंत पोहोचणार नाहीत अशा अवस्थेत प्रत्येक स्त्री–पुरुषाने स्वत:च स्वत:चा मार्गदर्शक समजून स्वातंत्र्यासाठी अहिंसेच्या चौकटीत अविश्रांत श्रम करावेत. हा लढा केवळ काँग्रेससाठी नसून सर्व देशासाठी भारताला मिळणारे स्वातंत्र्य काँग्रेससाठी नसून सर्व जनतेसाठी, असेल. असा म. गांधीना आदेश दिला व जाहीर केले की हे ' उघड बंड आहे, यात काहीही गुप्तता नाही, प्रत्येकजण स्वतंत्र समजून प्रत्येकाने आपला मार्ग ठरवावा. आपण एकतर स्वातंत्र्य मिळवू या किंवा स्वातंत्र्य मिळविण्याच्या प्रयत्नात मरू या, ' करेंगे या मरेंगे ', Do or die '!

## ' चले जाव ' ठराव हे एक आवाहन

८ ऑगस्ट १९४२ रोजी चले जाव ठराव विचारात घेतेवेळी कम्युनिस्टांनी विरोध केला, तेव्हा पं. जवाहरलाल नेहरू म्हणाले, ' चले जाव ठराव हे आव्हान नाही, ते एक आवाहन आहे, स्पष्टीकरण आहे, सहकार्याचे आश्वासन आहे. स्वतंत्र भारताच्या सहकार्याचे ते आश्वासन आहे. इतर कोणत्याही मुद्यावर सहकार्य नाही.'

आठ ऑगस्ट रोजी ठराव पास झाल्यावर दुसऱ्या दिवशी नऊ ऑगस्टला परत बैठक भरणार होती व त्यात म. गांधी बोलणार होते. सामुदायिक अहिंसात्मक चळवळ सुरू करण्याच्या अगोदर सरकारशी बोलणी कोणत्या तत्त्वावर होणार हे ते स्पष्ट करून सांगणार होते. पण त्या अगोदर मोठ्या पहाटेस ऑ. इं. काँ. क. च्या सर्व सभासदांना अटक करण्यात आली. म. गांधी महादेवभाई देसाई, मिराबेन यांना पुण्याच्या आगाखान पॅलेसमध्ये स्थानबद्ध केले. काँग्रेस वर्किंग कमिटीच्या सभासदांची अहमदनगरच्या तुरुंगात रवानगी केली.

## ' चले जाव ' ठरावासंबंधी प्रतिक्रिया

चलेजाव ठरावासंबंधी इतर पक्षांची प्रतिक्रिया:– वर्धा काँ. क. ने संमत केलेल्या ठरावाबद्दल स्वागत झाले त्याचबरोबर निषेधही झाला. चलेजाव ठराव म्हणजे काँग्रेसराज्यापुढे ब्रिटिशांना नमविण्याचा प्रयत्न आहे, असे बॅ. जीना म्हणाले. ब्रिटिशांबरोबर मुसलमानांनाही ही धमकी आहे असे समजून मु. लीगने चले जाव ठरावास पाठिंबा दिला नाही व डिसें. १९४३ च्या अधिवेशनात ' Divide and Quit ' (फाळणी करा आणि जा) अशी मुस्लीम लीगने घोषणा केली. काँग्रेसच्या धोरणास पाठिंबा देऊ नये असे स्वा. सावरकर आणि सप्रू या लिबरल नेत्यांनी ('सविनय कायदेभंग ') चळवळ देशाच्या संरक्षणास व हितास घातक आहे, म्हणून मागे घेण्यात यावी, असे सांगितले. कम्युनिस्ट पक्षाचे जनरल सेक्रेटरी पी. सी. जोशी यांनी भाईंना सांगितले की, काँग्रेस नेत्यांनी सांगितलेला मार्ग हा स्वातंत्र्य प्राप्तीचा नसून ' स्वातंत्र्ययुद्धातून राष्ट्रास मागे खेचण्याचा आहे. ' म्हणून भाईंनी आंदोलनात भाग घेऊ नये. ' रशियाच्या हितविरोधी असे काहीही करू नये. ब्रिटिशांच्या युद्धप्रयत्नात मदत करण्यातच रशियाचे हित सामावलेले आहे.' अशी भाईंची श्रद्धा होती. ब्रिटिश-अमेरिकन वृत्तपत्रांनी ' चले जाव ' आंदोलनाचा धिक्कार केला. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी चले जाव आंदोलन हे ' जाहीर बंड ' ठरविले. ब्रिटिश लेबर पार्टीच्या नेत्यांनी म. गांधींवर वैयक्तिक हल्ले चढविले.

# ‘ उघड बंडाचा ’ पसरलेला वणवा

काँग्रेस नेत्यांच्या धरपकडीची वार्ता आल्याबरोबर त्या दिवशी (नऊ ऑगस्ट) मुंबई, पुणे, अहमदाबादमध्ये निदर्शने झाली. १० ऑगस्टला दिल्ली व उत्तरप्रदेशातील शहरात वणवा पसरला. ११ ऑगस्टपासून सर्व भारत ‘ चले जाव ’, ‘ करेंगे या मरेंगे ’ घोषणांनी खळबळून गेला. ब्रिटिश सरकार जागरूक असूनही सरकारला तीन महिन्यापर्यंत ‘ उघड बंडाचा ’ वणवा शांत करता आला नाही.

काँग्रेस वर्किंग कमिटी, ऑ. इं. कॉं. क; प्रांतिक काँग्रेस समित्या बेकायदा ठरविल्या. अखिल भारतीय, प्रांतिक, जिल्हा, तालुका पातळी-वरील काँग्रेस नेते तुरुंगात टाकले. जनतेस मार्गदर्शन करण्यासाठी एकही नेता मोकळा ठेवला नाही. नेत्याशिवाय जनता काहीही करू शकणार नाही व शांत राहील हा सरकारचा हिशोब चुकला. चले जाव आंदोलनास पाठिंबा न देणारे मु. लीग, हिंदु महासभा, कम्युनिस्ट, लिबरल इ. पक्ष समाजात रुजले नव्हते. तशी कल्पना काँग्रेसपक्षाबद्दल करून घेणे चुकीचे होते १९२० नंतर म. गांधींनी काँग्रेसची चळवळ खेडोपाडी पसरविली होती. काँग्रेस नेत्यांना अटक होताच जनतेने ‘ चले जाव ’ चा आपल्या बुद्धीप्रमाणे अर्थ लावून तीन महिन्यापर्यंत चळवळ चालू ठेवली. हरताळ, निषेधसभा, निदर्शने केली. दळणवळण व संदेशवाहन तोडण्यासाठी तारा तोडल्या, रेल्वे रूळ उखडले. मोटारी, बसेस, ट्रामगाड्या जाळल्या. मुंबई शहरातील खाजगी वाहनात खादी टोपीवाला जर आत नसेल तर सर्व खाजगी वाहने, मोटारी, टांगे अडविले. झाडे तोडली, रस्त्यावरील दिवे फोडले, दुकाने लुटली, लुटीचा धाक दाखवून पैसे उकळले, तार-टपाल-रेल्वे कार्यालये जाळली व नासधूस केली. इलेक्ट्रिक पॉवर हाऊसवर हल्ले चढविले. सरकारी व सार्वजनिक इमारती जाळल्या, पोलीस चौक्या जाळल्या. पोलीस ठाण्यावर हल्ले चढविले. प्रसंगी पोलीस व पोलीस अधिकाऱ्यांना ठार मारले. कम्युनिस्टांनी आंदोलनात भाग न घेतल्याकारणाने उत्पादन

करणारे खाजगी व सरकारी कारखाने मोडतोडीपासून अलिप्त राहिले. नासधूस-संप यावर भर देणाऱ्या कम्युनिस्टांनी रशियाखातर अधिक उत्पादनावर भर दिला. कम्युनिस्ट प्रभावळीपासून अलिप्त असलेल्या अहमदाबादमधील मजूर संघटनेने मात्र तीन महिने यशस्वीरीत्या संप घडवून आणले. संपवाल्या मजुराना बड्या लोकांनी आर्थिक मदत केली. मुंबईत फक्त तीन-चारच गिरण्या बंद पडल्या. कॉंग्रेस प्रभावळीखाली असलेल्या जमशेटपूरच्या टाटा आयर्न व स्टील वर्क्समधील वीस हजार कामगारांनी संप केला. 'कॉंग्रेस नेते मुक्त करण्यासाठी व राष्ट्रीय सरकार स्थापन करण्यासाठी सरकारकडे वाटाघाटीचे प्रयत्न करू' असे आश्वासन चालकाकडून मिळाल्यावरच कामगारांनी संप मागे घेतला.

रेल्वे रूळ उखडणे, सिग्नल कॅबीन पाडणे इत्यादींमुळे ठिकठिकाणी रेल्वे वाहतूक विस्कळीत झाली. बिहार व उत्तर प्रदेशातील पूर्व भाग यात काही आठवडे वहातूक बंद होती. बंगालचा उत्तर प्रदेशाशी संबंध तुटला. गुंटूर व बेझवाडा जिल्ह्यात रेल्वेला नुकसान पोहोचविल्याने त्या जिल्ह्यांचा मद्रासशी संबंध तुटला. मद्रास मेल काही दिवस बंद पडली. तर काही दिवस फक्त दिवसाच कमी वेगात प्रवास करी. बेझवाडा ते चित्रगुंटा यातील १३० मैलांचा रेल्वेमार्ग विस्कळीत झाला.

## 'विद्यार्थ्यांची कामगिरी'

चले जाव आंदोलनात विद्यार्थ्यांनी विशेषत: हिंदू विद्यार्थ्यांनी हिरीरीने भाग घेतला. पिकेटिंग केले, सरकारी हुकूम धाब्यावर बसवून सभा मिरवणुका घेतल्या. तारा तोडल्या, मोडतोड केली. अलीगढ विद्यापीठाखेरीज दिल्ली ते ढाका आणि लाहोर ते मद्रास या दरम्यानची विद्यापीठे, महाविद्यालये, माध्यमिक शाळा बंद पडल्या. चळवळीच्या सुरुवातीसच बनारस युनिव्हर्सिटीचा ताबा लष्कराला घ्यावा लागला.

# प्रतिसरकाराची स्थापना

मिदनापूर, बालीया, सातारा इ. ठिकाणी जनतेने प्रतिसरकारे स्थापन केली (१) मिदनापूर (बंगाल) येथील प्रतिसरकार- १७ डिसेंबर १९४२ ते ८ ऑगस्ट १९४४ पर्यंत तामलुक विभागात प्रतिसरकार म्हणून कार्य करीत होते. म. गांधीच्या विनंतीवरून प्रतिसरकार रद्द करण्यात आले. प्रतिसरकारमध्ये एक हुकूमशहा, काही मंत्री, न्यायाधीश, पोलीस-दल, गुप्तहेर, शुश्रूषा पथक यांचा समावेश असून शांतता, सुव्यवस्था, न्याय-दान इ. स्वरुपाची कामे प्रतिसरकारकडून केली जात. याशिवाय गोरगरीब व असहाय्य लोकांना मदत केली जाई. मिदनापूर प्रतिसरकारने १०४ तारघरे व पोस्ट ऑफिसे मोडली. २७ मैल लांबीच्या टेलीफोन तारा तोडल्या चार पोलीस ठाण्यावर हल्ले चढविले. (२) बालीआ . उत्तरप्रदेश) येथील प्रतिसरकार- १८ ऑगस्ट १९४२ च्या रात्री बालीआतील लोकांनी हरताळ पाडला, मिरवणुका काढल्या, तारा तोडल्या, पूल उडविले, रूळ उखडले व प्रांतिक सरकारशी जिल्ह्याचा संबंध तोडल्यावर कलेक्टर कचेरी व ट्रेझरीचा ताबा घेण्यासाठी निघाले. ताबा घ्यावयास येणाऱ्या हिंसक जमावास अडविण्यासाठी तुरुंगातील चितु पांडे व इतर १०० कॉंग्रेस कार्यकर्त्यांना मुक्त केले. मुक्त झालेल्या कार्यकर्त्यांनी बालीआ मुक्त झाल्याची घोषणा केली (२० ऑगस्ट) व सरकारी अधिकाऱ्यांना कैद करून ट्रेझरीचा व शस्त्रागाराचा ताबा घेतला पण दोन दिवसांनी लष्कराने रात्री शहरात प्रवेश करून ब्रिटिश राज्य प्रस्थापित केले. (२३ ऑगस्ट) व मारझोड गोळीबार, जाळपोळ, बलात्कार, लुटालूट इ. गोष्टींचा धुमा-कूळ घातला. भागलपूर (बिहार) येथेही प्रतिसरकार स्थापण्याचा प्रयत्न झाला पण तो अल्पकालीन ठरला. (३) सातारा प्रतिसरकार- चले जाव आंदोलन सुरू झाल्यावर जनतेने ठिकठिकाणी सभा, मिरवणुका, मोर्चे काढले. पैकी वडूज व इस्लामपूर येथील मोर्च्यावर गोळीबार झाला. कार्यकर्ते भूमिगत कार्यकर्त्यांनी राज्ययंत्रणा बंद पाडण्यासाठी जाळपोळ

केली. सरकारी इमारतीची नासधूस केली, वाईचे न्यायालय जाळले, तीन मालगाड्या पाडल्या, शिरवडे व चरण येथील पोलिसांच्या बंदुका लांबविल्या काही भूमिगत कार्यकर्त्यांना केवळ राज्ययंत्रणा बंद पाडणे पसंत पडले नाही. तर बंद पडलेल्या राज्ययंत्रणेची जागा घेण्यासाठी प्रतिसरकार स्थापन करण्याचा प्रयत्न केला (नोव्हें. १९४४). प्रतिसरकार स्थापन करून सातारा जिल्ह्यात ग्रामराज्याची स्थापना केली. प्रतिसरकारची घटना बनविण्यासाठी १०५ भूमिगत कार्यकर्त्यांनी करंजखोप येथे तीन आठवडे तळ ठोकला (१९४५). तथापि कार्यकर्त्यांनी ब्रिटिश सरकारला दाद दिली नाही. पोलिसांनाच फितूर करून सातारा पोलीस हेडक्वार्टरमधून त्यांनी तीन बंदुका लांबविल्या; शेगोलीच्या रानात रेल्वेगाडी लुटली. प्रतिसरकारमधील कार्यकर्त्यांनी चिमठाणा (धुळे जिल्हा) येथे ५॥ लाखांचा खजिना लुटला. यास खानदेशातील शंकर माळी, व्यंकटराव धोबी, डॉ. उत्तमराव पाटील व सातारा जिल्ह्यातील किसनमास्तर, नागनाथ नाईकवडी आप्पा पाटील इ. कार्यकर्त्यांचे धैर्य कारणीभूत होते. भूमिगत कार्यकर्त्यांवर तलवारीचा वार करणाऱ्या व पोलिसांना माहिती पुरविणाऱ्या देऊरच्या पोलीस पाटलाचा त्यांनी खून केला. प्रतिसरकारच्या अध्यक्षस्थानी किसन वीर तर बाबूराव घोरपडे हे प्रमुख न्यायाधीश होते. डी. जी. देशपांड्यांनी 'बहिरजी नाईका'ची भूमिका उत्तम बजावली. सराईत दरोडेखोरांनी भूमिगत कार्यकर्त्यांच्या नावाने अनेक दरोडे पाडले व खून केले तेव्हा दरोडेखोरांपासून समाजाला होणारा त्रास नष्ट करण्यासाठी व समाजात शांतता-सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी दरोडेखोरांचा बंदोबस्त केला. पोलिसांना माहिती पुरविणारे व समाजविरोधी कृत्ये करणारे यांच्या तळपायावर छडी मारून शासन केले जाई. ह्या तळपायावर छडी मारून शासन करण्याच्या पद्धतीस पत्री मारणे असे म्हणत. म्हणून पत्री मारणाऱ्या प्रतिसरकारला 'पत्री सरकार' असे नाव पडले. प्रतिसरकारने गावोगावी न्यायालये भरवून झटपट व मोफत न्याय दिला. ग्रामीण भागातील हुंडा पद्धत, लग्नातील वाजंत्री, जेवणावळीचा आवाक्याबाहेरचा खर्च याला आवर घालण्याचा प्रयत्न केला व विधायक कार्यास हातभार

लावला. कर्जापायी गेलेल्या जमिनी योग्य नुकसानभरपाई देऊन परत करावयास लावल्या. आंदोलनातील व प्रतिसरकारमधील क्रांतिसिंह नाना पाटील, किसनवीर बाबूराव घोरपडे, कासेगांवकर वैद्य, उत्तमराव पाटील व पांडू मास्तर कचरे इ. भूमिगत कार्यकर्त्यांचे कार्य पाहून म. गांधी, पं. जवाहरलाल नेहरू, अशोक मेहता यांसारख्या श्रेष्ठ देशभक्तांनी कार्यकर्त्यांची प्रशंसा केली. १९४६ च्या सुरवातीस घटनात्मक ताळेबंदी नष्ट होऊन कांग्रेसने मुंबईस प्रांतिक मंत्रीमंडळ बनविल्यावर भूमिगत कार्यकर्त्यांनी प्रतिसरकार रद्द केले (मे १९४६) प्रतिसरकारमधील कार्यकर्त्यांवर खटला भरावा असा सरकारचा विचार होता व त्यासाठी भारतमंत्र्याची परवानगी मागितली परंतु डिसें. १९४५ त झालेल्या आझाद हिंद फौजेच्या खटल्याप्रमाणे हा खटला चालेल व त्याचा देशात मोठा मवगवा होऊन राष्ट्रीय भावना आणखी प्रखर होतील व अशांतता माजेल म्हणून खटला चालविण्यास भारतमंत्र्याने परवानगी नाकारली.

अरुणा असफअली, राममनोहर लोहिया, अच्युत पटवर्धन, जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय कार्यकर्त्यांनी भूमिगत होऊन प्रतिकार केला. त्यांचे कार्य पाहून पं. जवाहरलाल नेहरू म्हणतात, 'बेचाळीसच्या या क्रांतिकारकांनी जे केले ते कदाचित मीही त्या स्थितीत केले असते. या संग्रामात अरुणादेवींची कामगिरी फार उज्ज्वल आहे.' 'सातारा, मिदनापूर, बिहार, बंगाल व उत्तर प्रदेश यातील घटना हिंदी जनतेच्या स्वातंत्र्याच्या इतिहासातील वैभवाची प्रकरणे ठरतील.' जयप्रकाश नारायण यांनी हजारीबागच्या सेंट्रल जेलमधून इतर पाच जणांसह ९ नोव्हेंबर १९४२ रोजी पलायन केले.

भूमिगत राहून 'स्वातंत्र्य लढयात भाग घेणाऱ्या सर्व सैनिकांसाठी' नावाचे पुस्तक कोठून तरी प्रसिद्ध केले व सशस्त्र क्रांतीचा पुरस्कार केला. दिल्ली, मुंबई, मद्रास, कलकत्ता शहरात भूमिगत राहून संघटना केली व नेपाळमध्ये जाऊन, ब्रिटिश सरकार विस्कळीत करण्यासाठी गनिमी लढयाच शिक्षण दिलेल्या टोळया 'आझाद दस्ता' तयार केल्या. मे १९४३ त ते पकडले गेले व त्यांना हनुमाननगर जेलमध्ये ठेवण्यात आले तेव्हा ५०

क्रांतिकारकांनी जेलवर हल्ला चढवून जयप्रकाश नारायण व इतर सहा जणांना जेल मधून मुक्त केले. कलकत्त्यास भूमिगत राहून त्यांनी सुभाष बाबूंच्या आझाद हिंद सेनेशी संधान बांधण्याचा प्रयत्न केला.

सिंधचे मुख्यमंत्री अल्लाबक्ष यांनी कॉंग्रेसच्या 'चलेजाव' आंदोलनास सहानुभूती म्हणून आपणास मिळालेल्या मानदर्शक पदवीचा त्याग केला तेव्हा सिंध प्रांताच्या गव्हर्नराने, अल्लाबक्षच्या पाठीमागे विधीमंडळात बहुमत असूनही, अल्लाबक्षला मुख्यमंत्रीपदावरून दूर केले. (ऑगस्ट १९४२). शिकारपूर येथे भर दिवसा अल्लाबक्षचा खून करविण्यात आला.

सरकारकडून जुलूमी दडपशाहीची कृत्ये होतात याबद्दल बंगालचे मुख्यमंत्री डॉ. शामाप्रसाद मुकर्जी यांनी निषेध व्यक्त केला. सामुदायिक दंड बसविताना फक्त हिंदू लोकांकरच बसविला जातो. याबद्दल निषेध व्यक्त करण्यासाठी डॉ. शामाप्रसाद मुकर्जींनी बंगालच्या मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला.

# ' चले जाव ' चळवळीचा ताळेबंद

२५० रेल्वे स्टेशनांची नासधूस करण्यात आली अथवा नाश करण्यात आला, ५०० पोस्ट ऑफिसांवर हल्ला चढविण्यात आला, पैकी ५० पोस्ट ऑफिसे जाळण्यात आली, १५० पोलीस ठाणी व इतर इमारती जाळण्यात आल्या. टेलिफोन व टेलीग्राफच्या तारा ३५०० ठिकाणी तोडण्यात आल्या. थोडे अधिकारी, काही गोरे शिपाई, ३० पोलीस, ११ लष्करी शिपाई ठार झाले. चोरी चोराप्रमाणेच अष्टी (म. प्रा.) येथे प्रकार घडला. पोलिसांनी गोळीबार केला त्यात पाच जण ठार झाले. तेव्हा जमावाने एक सबइन्स्पेक्टर व चार पोलीसांना ठार केले. सरकारी नोकरांनी राजीनामा देण्यास व काँग्रेस संघटनेत येण्यास नकार दिला म्हणून जमावाने चिमूर (म. प्रा.) येथे एक पोलीस सर्कल इन्स्पेक्टर, सब डिव्हिजनल मॅजिस्ट्रेट, व तहसील-दार यांना ठार केले. मिनापूर (मुंझफरपूर, बिहार) येथे लोकांनी पोलीस ठाण्यावर हल्ला चढवून पोलीस सबइन्स्पेक्टरला जिवंत जाळले.

## सरकारची दडपशाही

नेत्यांच्या धडपडीनंतर ठिकठिकाणी हरताळ, निषेध सभा, मिरवणुका निदर्शने होऊ लागली. त्यांना तोंड देण्यासाठी सरकारी आज्ञा सुटू लागल्या. भारत संरक्षण नियमान्वये दुकाने, उपहारगृहे बंद करण्यास यांच्या बातम्या छापण्यास व प्रसिद्ध करण्यास बंदी घातली. काँग्रेसने पुरस्कारलेल्या सामु-दायिक लढ्याबद्दल, लढ्यातील घटनांबद्दल व त्या घटनासंबंधी सरकारने केलेल्या कृत्तीबद्दल छापण्यास बंदी केली. वृत्तपत्रावर सरकारी नियंत्रणे आल्यावर काँग्रेसचा रेडिओ मुंबई शहरातून लोकांना इत्थंभूत बातम्या पुरवू लागला. काँग्रेसची पत्रके जनतेस वारंवार बातम्या देऊ लागली.

बालीआ, कलकत्ता, चित्तगांव शहरावर विमानातून बाँबफेक करण्यात आली. बाँबफेकीत ३५० जखमी झाले, ९ ऑगस्ट १९४२ ते ३१ डिसेंबर

१९४२ पर्यंत साठ हजार लोकांना अटक करण्यात आली. २६ हजार लोकांना कमी अधिक मुदतीच्या शिक्षा देण्यात आल्या. भारत संरक्षण नियमानुसार १८ हजार लोकांना विनाचौकशी स्थानबद्ध करण्यात आले. पोलिसांकडून अथवा लष्कराकडून ५३८ वेळा गोळीबार करण्यात आला. पाच ठिकाणी विमानातून मशीनगन्सच्याद्वारा लोकांवर गोळीबार करण्यात आला. गोळीबारात ९४० ठार झाले व १८३० जखमी झाले. एकूण साठ ठिकाणी लष्कर बोलविण्यात आले. अष्टी, चिमूर, मिदनापूर, बालीआ या चार ठिकाणी पोलीसाकडून अत्याचाराची कृत्ये झाली. अश्रूधूर लाठीमाराचा सर्रास वापर झाला. फटक्यांची शिक्षा देण्याचे प्रसंग ५३८ दा आले. ग्रामीण विभागावर ९० लक्ष रु. चा सामुदायिक दंड लादण्यात आला. 'सर्व वजन खर्चून गोरे शिपाई पाठवून चळवळ दडपून टाळण्यात आली.' 'ब्रिटिश साम्राज्याचे दिवाळे काढण्यासाठी मी पंतप्रधान झालो नाही' असे पंतप्रधान चर्चिल यांनी उद्‌गार काढले.

बेचाळीसच्या अत्याचारास कॉंग्रेस जबाबदार आहे असे सरकारी गटाकडून सांगण्यात आले. तर त्या अत्याचारास सरकार जबाबदार आहे असे म. गांधींनी सांगितले. लष्कराकडून व पोलिसांकडून झालेल्या अत्याचारांची सरकारने नि:पक्षपातीपणाने चौकशी करावी अशी म. गांधींनी. सरकारला विनंती केली. सरकारने विनंती नाकारल्याने म. गांधीनी ९ फेब्रुवारी १९४३ पासून २१ दिवसांचे उपोषण सुरू केले. उपोषण कालात म. गांधींची तब्येत बिघडली असताही सरकारने म. गांधीना मुक्त करण्याचे नाकारले, म्हणून लो. अणे, सर होमी मोदी, सरकार यांनी ग. ज. च्या कार्यकारी मंडळातील सभासदत्वाचे राजिनामे दिले.

१९२१ च्या असहकार चळवळीने लोकांच्या मनातील तुरुंगाची भीती नष्ट केली. १९३० च्या सविनय कायदेभंग चळवळीत स्वातंत्र्य प्राप्तीसाठी लोकांनी मिळकतीचाही त्याग केला व स्वार्थत्यागाच्या कसोटीतून पार पडले. १९४२ च्या चले जाव आंदोलनात त्यापेक्षाही अधिक स्वार्थत्याग जनतेने केला. करेंगे या मरेंगे या ध्येयाने प्रेरित होऊन कार्य केले. चळवळीस काही ठिकाणी यश मिळाले पण सर्वसामान्यत: घवघवीत यश मिळाले नाही.

१९४२ ची चळवळ दडपली गेली. चळवळीची संघटना व योजना करण्याच्या अगोदरच नेत्यांना तुरुंगात टाकण्यात आले. नेतृत्वहीन जनतेने हिंसात्मक कृत्ये करताच सरकारला हिंसात्मक कृत्ये करण्यात सकारण सापडले व चळवळ दडपण्यासाठी पाशवी शक्तीचा वापर केला.

## ' चले जाव ' चळवळीचे फलित

'चले जाव' आंदोलनात घवघवीत यश मिळाले नसेल पण ह्या आंदोलनामुळे स्वातंत्र्य जवळ आले. स्वातंत्र्यासाठी सामान्य जनता प्राणार्पण करण्यास तयार आहे. अशा अवस्थेत राष्ट्रीय चळवळ येऊन पोहोचली. स्वातंत्र्य जर लवकर दिले नाही तर क्रांती अथवा उठाव होण्याची शक्यता आहे. असे ब्रिटिशांना आढळून आले. आपण फार काळ हिंदुस्थान ताब्यात ठेवू शकत नाही. याची जाणीव राज्यकर्त्यांना झाली. चले जाव आंदोलनामुळे भूदल, नौदल व विमानदल या लष्कराच्या तिन्ही शाखातील शिपायात स्वातंत्र्यप्रेमाची भावना वाढीस लागली हे नंतरच्या घटनांवरून दिसून येते.

## हिंदी राष्ट्रीय सभेचा इतिहास

## प्रकरण पहिले

# काँग्रेसचा जन्म

ईस्ट इंडिया कंपनीने अनेक व्यापारी व राजकीय उलाढाली करून जवळ जवळ शंभर वर्षात हिंदुस्थानातील बराच मुलुख काबीज केला व राजसत्तेचे सर्व अधिकार ती उपभोगू लागली. त्यामुळे अर्थातच कंपनीच्या या कारवाईकडे ब्रिटीश पार्लमेंटचे लक्ष गेले व १७७२ नंतर कंपनीला वेळोवेळी ज्या ज्या नवीन सनदा देण्यात आल्या; त्या त्या वेळी कंपनीच्या कारभाराची ब्रिटिश सरकारतर्फे पूर्ण चौकशी करण्यात येऊ लागली. उत्तरोत्तर व्यापार वाढविण्याचा कंपनीचा मूळ उद्देश मागे पडून ती राजकारण प्रधान होत गेली. त्याबरोबर इंग्लंडमधील सडमंड बँक, शेरिडन फॉक्स वगैरे मंडळीचे कंपनीच्या हिंदुस्थानातील कारभाराकडे १८ व्या शतकाच्या अखेरीस विशेष लक्ष गेले व तिच्या एजंटाची येथील दुष्कृत्ये त्यांनी उजेडात आणली. वॉरन हेस्टिंग्जवर दोषारोप ठेवून त्याला योग्य ते शासन करण्याचा या मंडळींचा उद्देश जरी साध्य झाला नाही तरी कंपनीचे अधिकारी हिंदी जनतेवर कशाप्रकारचे जुलूम व अत्याचार करीत आहेत ही गोष्ट त्यांनी ब्रिटिश जनतेपुढे मांडली. कंपनीच्या एजंटांनी यापुढे राज्य विस्तार करण्याचा यत्न करू नये या धोरणाचे अवलंबन करण्याला कंपनीला नव्या नव्या सनदा देत असताना अनेकवेळा सांगण्यात येत असे. पण कंपनीने पार्लमेंटचे हे हुकूम धाब्यावर बसविले व हिंदुस्थानातील एकेक प्रांत संधी साधून नगर निर्माण करून घशात टाकले. ही मुलूखगिरी करीत असताना कंपनीने कोणकोणती कृष्णकृत्ये केली, तिने कोणाकोणाचा विश्वासघात केला व कसकसे तहनामे व वचने मोडीत असे, मानवी

स्वभावातील लोभी व नीच वृत्तीचे तिने कसे प्रदर्शन केले हे येथे सांगत बसण्याची आवश्यकता नाही. तसेच हिंदुस्थानातील लोकांनीही परस्परांशी कसे निमकहरामीपणाचे वर्तन केले, याचाही विचार करण्याचे हे स्थळ नव्हे. कंपनीच्या एजंटानी कंपनीला व डायरेक्टरांना तर गबर केलेच पण स्वत:साठी अगणित संपत्ती मिळविण्याकरिता कोणत्या मार्गांचा व साधनांचा अवलंब केला त्याचाही इतिहास सांगणे नको. वाफेच्या इंजिनाचा शोध लागून यांत्रिक युगाला आरंभ झाल्यानंतर एकोणिसाव्या शतकात आपले औद्योगिक वर्चस्व वाढविण्याच्या कामी इंग्लंडला भांडवल म्हणून या संपत्तीचा चांगला उपयोग करता आला एवढे सांगितले म्हणजे पुरे.

१७७४ साली रेग्युलेटिंग ॲक्ट मंजूर करून कंपनीने हिंदुस्थानात मिळविलेल्या मुलुखाचा कारभार पाहण्याची जबाबदारी ब्रिटिश पार्लमेंटाने प्रथमच आपल्या अंगावर घेतली. हे नियंत्रण हळूहळू वाढत जाऊन १७८५ साली दुसरा एक कायदा पास करण्यात आला. पुढे १७९३, १८१३, १८३३ व १८५२ या साली प्रत्येक वेळी चौकशी करून कंपनीला नव्या नव्या सनदा देण्यात आल्या. कंपनीने मिळविलेल्या मुलुखातील रहिवाशाला व ब्रिटीश राज्याच्या जन्मजात रयताला धर्म, जन्मस्थान वंश व वर्ण वगैरे कोणताही भेदाभेद न करता कंपनीने आपल्या राज्यकारभाराच्या खात्यातून नोकऱ्या द्याव्या. असा एक कायदा १८३३ साली करण्यात आला, पण कोर्ट ऑफ डायरेक्टरांनी त्याचा सोईस्कर अर्थ करून तो धुडकावून लावला. १८३३ च्या या कायद्याने कंपनीचे हिंदुस्थानात व्यापार करण्याचे हक्कही काढून घेण्यात आले व त्यामुळे कंपनीचे व्यापारी स्वरुप जाऊन पूर्ण राज्य सत्ताधारी बनली.

हिंदुस्थानात इंग्रजी शिक्षण सुरू करावे की नाही, या संबंधाने यावेळी बरीच चर्चा झाली. तेथे हिंदुस्थानातील भाषांचे व वाङ्मयाचे शिक्षण सुरू करावे असे म्हणणारा एक पक्ष होता. पण हिंदवासियांपैकी राजा राममोहन राय व इंग्रजांपैकी मॅकॉले यांनी इंग्रजी शिक्षणाचाच जोराने पुरस्कार केला व त्यांचे म्हणणे ग्राह्य ठरून प्रचलित शिक्षणपद्धतीचा पाया घालण्यात आला.

यावेळी हिंदुस्थानात वर्तमानपत्रे नव्हती. काही इंग्रज लोकांनी वर्तमानपत्रे काढून ती चालविण्याचा प्रयत्न केला पण त्यांच्यापैकी काहीना हद्दपार व्हावे लागले, लॉर्ड विल्यम बेंटिंक यांनी वृत्तपत्राकडे या दृष्टिने पाहिले व त्यांचे अनुयायी सर चार्लस मेंटकॉफ यांनी मुद्रणावरील सर्व बंधने काढून टाकली. त्यामुळे १८५७ च्या बंडाचा काळ सोडून लॉर्ड लिटनच्या कारकीर्दीपर्यंत वृत्तपत्रानी हे स्वातंत्र्य भोगले.

## १८५७ चे सशस्त्र बंड

१८३३ ते १८५३ या वीस वर्षात पंजाब व सिंध हे दोन प्रांत जिंकण्यात आले. लॉर्ड डलहौसीने दत्तक घेण्याची परवानगी नाकारून काही संस्थानिकांचा मुलूख बळकावला तर औंधच्या संस्थानिकाला आपल्या संस्थानात नीट बंदोबस्त ठेवता येत नाही व योग्य प्रकारे राज्यकारभार चालविता येत नाही. असे निमित्त करून तोही मुलुख खालसा केला. याप्रमाणे हिंदुस्थानचा मुलुख खालसा होऊन एकीकडे परकीय राजसत्ता झपाट्याने प्रस्थापित होत होती व दुसरीकडे आर्थिक शोषणामुळे हिंदी जनतेचे दारिद्र्यही वाढत चालले होते. वरील असंतोषच १८५७ च्या बंडाला कारणीभूत झाला. १८५७ चे बंड म्हणजे परकीय राज्यसत्तेचे झुगारून देण्याचा हिंदुस्थानचा शेवटचा सशस्त्र प्रयत्न होय. या बंडाला धार्मिक हेतू थोडासा कारणीभूत झाला होता हे खरे असले तरी अकबर औरंगजेबचा वंशज असलेला दिल्लीचा बादशहा व पुण्याच्या पेशव्यांच्या वंशज यांनी उभारलेल्या निशाणाखाली हे बंडवाले एकत्र झाले होते. १७५७ च्या प्लासीच्या युद्धापासून शंभर वर्षात इंग्रजानी हिंदुस्थानातील जो मुलुख बळकावला तो पुन्हा काबीज करून हिंदुस्थानात हिंदी राज्य प्रस्थापित करावे या हेतूने हे बंड उभारण्यात आले होते. आपल्या लोकांवर व राष्ट्रावर आपण स्वतःच राज्य चालवावे, त्यावर दुसऱ्या कोणाची सत्ता असू नये ही मानवी हृदयातील स्वाभाविक भावना या बंडाला कारणीभूत झाली होती.

हे बंड अयशस्वी झाले व त्याबरोबर ईस्ट इंडिया कंपनीही अस्तंगत झाली आणि ब्रिटनचा राजा म्हणजेच ब्रिटिश पार्लमेंट यांच्या हातात

प्रत्यक्ष हिंदुस्थान सरकारच्या राज्यकारभाराची सूत्रे गेली. यानंतर राणीचा जाहिरनामा प्रसिद्ध झाला त्यामुळे देशात शांततेचे व विश्वासाचे वातावरण निर्माण झाले. परकी राज्य सत्तेबद्दलचा असंतोष काही लोकांच्या अंतःकरणात धुमसत होता पण ते अगदी असहाय्य झाले होते. देशातील सर्व सरदारघराणी विशेषतः मुसलमान सरदार घराणी जवळ जवळ नष्ट करून टाकण्यात आली होती. १८५७ प्रमाणे ज्याच्या निशाणाखाली जनता येईल अशी एकही राजघराण्यातील व्यक्ती शिल्लक ठेवली नव्हती, ईश्वरी कृपेमुळे हिंदुस्थानवर ब्रिटिशांची सत्ता प्रस्थापित झाली आहे. असेही काही लोकांना वाटू लागले होते आणि आमचा राष्ट्रीय स्वभावधर्म जो देववाद त्यावर हवाला ठेवून लोक स्थिरस्थावर झाले होते.

## हिंदी लोकांची कोंडी

ब्रिटिश राजमुकुट धारण करणाऱ्या व्यक्तीकडे हिंदुस्थानची राज्य-सूत्रे गेली तरी राज्यकारभाराच्या पूर्वीचे धोरणात काही बदल झाला नाही. फक्त यापुढील २० वर्षात कोठे लढाया वगैरे झाल्या नाहीत व राज्य कारभाराचा एकसूत्रीपणाला कोठे अडथळा आला नाही. एवढेच पण इतके असले तरी हिंदुस्थानात कोठेही अशांतता व गडबड नव्हती. असे मात्र म्हणता यावयाचे नाही. ब्रिटिशांचे राज्यकारभारातही भयंकर दोष होते व त्यांचे आविष्करण करून ते काढून टाकण्याचा प्रयत्न हिंदु-स्थानाविषयी सहानुभूती बाळगणारे मि. ह्यूमसारखे ब्रिटिश अधिकारी करीत होते.

वर्ण, जात धर्म, वंश वगैरे बाबतीत भेदाभेद न करता कोणत्याही हिंदी इसमाला त्याच्या शिक्षणानुसार सरकारी खात्यातून जागा देण्यात यावी असे १८३३ च्या कायद्याने ठरविण्यात आले होते. १८५३ साली कंपनीला नवीन सनद देण्याचा विचार चालू असता कंपनीने गेल्या तीन वर्षांत या कायद्याची अंमलबजावणी केली नाही. असे पार्लमेंटात स्वतंत्रपणे सांगितले गेले. याचसाठी इंग्लंडमध्ये सिव्हिल सर्विसची चढाओढ परीक्षा

घेण्याची पद्धती सुरु करण्यात आली. या पद्धतीमुळे सरकारी खात्यात मोठ्या नोकऱ्या मिळण्याच्या बाबतीत लोकांच्या दृष्टीने मोठाच अडथळा उत्पन्न झाला. या अडथळ्याला न जुमानता काही हिंदी लोक सातासमुद्रापलीकडे इंग्लंडमध्ये जाऊनही परीक्षा पास होऊन येऊ लागले. तेव्हा लॉर्ड साल्सबरीने या परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांच्या वयाची मर्यादा कमी करून हिंदी लोकांच्या मार्गात आणखी एक नवीन अडथळा निर्माण केला. इंग्लंड व हिंदुस्थान या दोन्ही देशात सिव्हिल सर्व्हिसची एकाचवेळी परीक्षा झाली पाहिजे; अशी मागणी हिंदी पुढारी कित्येक वर्ष करीत होते व त्यांच्या या मागणीला इंग्रज गृहस्थांनीही पाठिंबा दिला होता. पण तिच्याकडे मुळीच लक्ष देण्यात आले नाही. पुढे लॉर्ड लिटन यांची कारकीर्द सुरू झाली. त्यांनी देशी वर्तमानपत्रांची मुस्कटदाबी केली. हत्यारांचा कायदा मंजूर करून हत्यारे वापरण्याचा हिंदी लोकांचा हक्क त्यांनी नष्ट केला. इतकेच नव्हे तर हिंदी व युरोपियन यांच्यात उपमर्दकारक भेदाभेद सुरू केला.

यानंतर हिंदुस्थानात दुष्काळ पडला. या दुष्काळाच्या दिवसात धान्याच्या टंचाईमुळे लोकांना खावयास मिळाले नाही असे नव्हे, तर धान्य असूनही ते विकत घेण्याचे त्राणच लोकांपाशी उरले नव्हते. या दुष्काळात सर्व देशभर लाखो माणसे मृत्यूमुखी पडली. नंतर अफगाण युद्ध झाले व त्या हिंदुस्थानाचा अतोनात पैसा खर्च झाला. इकडे देशामध्ये दुष्काळाने व मृत्यूने धुमाकूळ मांडला होता. तर तिकडे दिल्ली येथे एक दरबार भरविण्यात आला व इंग्लंडच्या राणीला हिंदुस्थानची सम्राज्ञी हा किताब देण्यात आला.

## लार्ड लिटनची दडपशाही

या काळात देशातील शेतकरी वर्गही त्यांच्यावर रोजच्या रोज होत असलेल्या अन्यायांनी गांजून गेला होता. अतिशय खर्चाची व गैरसोईची दिवाणी कोर्टे, लाचखाऊ व जुलमी पोलीस, सारा वसूल करण्याची कडक पद्धती, हत्यांच्या कायद्याची व जंगल कायद्याची त्रासदायक अंमलबजावणी

वगैरे प्रकारच्या या सर्व अन्यायापासून आपला बचाव करण्याबद्दल शेतकरी वर्ग सरकारपाशी मागणी करीत होता. पण त्याची ही मागणी मान्य न झाल्यामुळे तो निराश झाला होता. १८८० च्या सुमारास हिंदुस्थानात ही परिस्थिती होती. नोकरशाहीने नव्या सवलतींना विरोध केला एवढेच नव्हे तर पूर्वीच्या पिढीतील सुधारणावाद्यांनी जे मुद्रणस्वातंत्र्य, सभा भरविण्याचा हक्क, स्थानिक स्वराज्याचे स्वातंत्र्य व विश्वविद्यालयाचे स्वातंत्र्य या संबंधीचे हक्क दिले होते तेही काढून घेतले. यांच्या जोडीला पोलिसांच्या दडपशाहीची रशियनपद्धती नोकरशाहीने अमलात आणली होती, यामुळे लॉर्ड लिटनच्या कारकीर्दीत क्रांतीकारिता, बंड उपस्थित होण्याचा प्रसंग अगदी जवळ येऊन ठेपला होता. अशावेळी म्हटले आहे, हिंदुस्थानातील अनेक धर्मगुरू व त्यांचे शिष्य आपसात पत्रव्यवहार करून हिंदुस्थानातील अनेक जिल्ह्यातून बंडाची उठावणी करण्याच्या तयारीत आहेत. अशा प्रकारच्या पुराव्याची सात पुस्तके मि. ह्यूम यांना मिळाली होती. याबाबतीत मि. ह्यूम यांच्या हाती जे रिपोर्ट लागले होते, त्यावरून हा बंडाचा प्रयत्न फारसा संघटित स्वरूपाचा नसला तरी निराशेने व्याप्त झालेले लोक काही तरी करण्यास प्रवृत्त झाले होते, असे त्यांना आढळून आले. हे काही म्हणज खून मारामाऱ्या, सावकारांच्या घरावर दरवडे व बाजारांची लूटालूट याच्याशिवाय दुसरे काय असणार? ही सर्व कृत्ये बेकायदेशीर खरी पण त्यांना दुसऱ्या राजकीय शक्तीचा पाठींबा मिळाल्यास याच कृत्याचे राष्ट्रीय क्रांतीत रूपांतर होण्याचा सभव असतो. मुंबई इलाख्यात शेतकरी लोकांचे दंगे अशाच स्वरूपाचे होते. मि. ह्यूम यांनी हे सर्व जाणूनच देशातील असंतोषाची वाफ बाहेर सोडण्याकरिता कॉंग्रेसची योजना केली. याच हेतूने मि. ह्यूम यांनी हिंदुस्थानात एक राष्ट्रीय संमेलन भरविण्याचे ठरविले व कलकत्ता युनिव्हर्सिटीच्या ग्रॅज्युएटांना त्यांनी १ मार्च, १८८३ रोजी एक हृदयाला हलवून सोडणारे पत्र पाठविले. सुशील, सत्‌निष्ठ, निःस्वार्थी, प्रामाणिक, संयमी समाजाची प्रत्यक्ष सेवा थरण्याची इच्छा असलेले व त्या करीता लागणारे निति धैर्य असलेले असे ५० लोक मिळाले तर वरील परिषदेसारखी एक राष्ट्रीय संस्था स्थापन करता येईल असे त्यांनी त्या पत्रात लिहिले होते. त्यांच्या पुढे त्यांनी पुढील ध्येय मांडले. लोकसत्ताक

राज्यपद्धती, वैयक्तिक महत्त्वाकांक्षेपासून अलिप्तपणा व तुमच्यापैकी जो सर्वात श्रेष्ठ आहे, त्याने तुमचा सेवक व्हावे हा सिद्धांत असून उलट पक्षी जर तुम्हाला स्वतःच्या सुखावर व ऐषआरामावर पाणी सोडता येत नसेल तर प्रगतीच्या सर्व बाता फुकट आहेत. हिंदुस्थानावर आज जे सरकार आहे, त्याच्या हाताखाली राहण्यासच ते लायक आहेत व यापेक्षा जास्त काही मिळविण्याची त्याची इच्छा नाही असेच म्हणावे लागेल, असे निर्भीडपणाचे विचार त्यांनी या पत्रात मांडले होते.

## सार्वजनिक चळवळी

काँग्रेसच्या जन्मासंबंधीची विस्तृत हकीकत सांगण्यापूर्वी देशातील सार्वजनिक जीवनाचा पाया ज्यानी घातला अशा काँग्रेसपूर्वीच्या पुढाऱ्या-संबंधाने व त्यांच्या चळवळी संबंधाने आपण थोडासा विचार करू

१८५१ साली बंगालमध्ये ब्रिटिश इंडियन असोसिएशन नावाची संस्था स्थापन झाली व तिच्याद्वारे डॉ. राजेंद्रलाल मित्र व रामगोपाळ घोष यानी कित्येक वर्षे सार्वजनिक कामे केली. ही संस्था अर्धशतकापर्यंत एक जागृत शक्ती होती. बंगालमधील वरील संस्थेच्या मानाने ही संस्था फार दिवस टिकली नाही. तरी, सर मंगलदास नथूभाई व मि. नवरोजी पर्सनजी यांच्या नेतृत्वाखाली या संस्थेने कितकीच महत्त्वाची सार्वजनिक कामे केली. दादाभाई नवरोजी व जगन्नाथ शंकर साठे यांनी या असोसिएशनची स्थापना केली होती. १८७० च्या सुमारास ईस्ट इंडिया असोसिएशन या नावाची एक संस्था स्थापन करण्यात आली. या संस्थेने मोठ्या नेटाने सार्वजनिक कामे करून वरील संस्थेला मागे टाकले. दक्षिणेस 'हिंदू' ने सार्वजनिक जीवनाला सुरवात केली. एम. वीर राघवाचारियर, आॅ. रंगय्यानायडू, जी. सुब्रम्मण्य, अय्यर व एन. सुब्बाराव पंतलू वगैरे सन्माननीय गृहस्थानी हे पत्र सुरू केले होते. हिंदू पत्र ज्या सुमारास सुरू झाले, त्याच सुमारास पुण्यात पुणे सार्वजनिक सभेची प्रस्थापना झाली. रा. ब. के एल्. नूलकर व एस. एच. चिपळूणकर यानी या संस्थेच्या पुरस्कर्तृत्वाखाली अनेक सार्वजनिक कार्ये केली.

बंगालमध्ये १८७६ साली इंडियन असोशिएशन नावाची संस्था स्थापण्यात आली. सुरेंद्रनाथ बानर्जी हे या संस्थेचे चालते बोलते प्राण होते व आनंद मोहन बोस हे या संस्थेचे पहिले सेक्रेटरी होते.

या सर्व सार्वजनिक चळवळी फारशा संघटित रीतीने चालविल्या जात नव्हत्या, तरी १८९० सालच्या या काळातदेखील अधिकारीवर्गावर त्यांचा परिणाम होऊ लागला होता. वर्तमानपत्राद्वारे होणारा मतप्रसार हा या चळवळीतील एक सामर्थ्यवान घटक होता. कारण १८७५ साली हिंदुस्थानात ४७५ वर्तमानपत्रे प्रसिद्ध होत होती. यापैकी बहुतेक सर्व पत्रे देशी भाषातूनच प्रसिद्ध होत होती. सुरेंद्रनाथ बानर्जी हे आय. सी. एस्. होते. पण राष्ट्राच्या सुदैवाने ते आपल्या कामातून मोकळे झाले होते. त्यांनी सेवानिवृत्त झाल्यावर उत्तर हिंदुस्थानात पंजाब प्रांतात पहिला राजकीय दौरा काढला. १८७७ साली दिल्लीला झालेल्या दरबाराला ते हजर होते व त्यांनी तेथे उपस्थित झालेल्या मोठमोठ्या संस्थानिकांच्या व इतर पुढाऱ्यांच्या भेटी घेतल्या. १८७७ साली दिल्ली येथे देशातील बड्या संस्थानिकाचे व इतर नामांकित व्यक्तींचे जे दरबारच्या निमित्ताने मीलन झाले तें पाहूनच अशा प्रकारची एक प्रचंड राजकीय परिषद भरवावी, अशी कल्पना सुरेंद्रनाथ बानर्जींना सुचली अशी काही लोकांची समजूत आहे. १८७८ साली मुंबई व मद्रास इलाख्यात त्यानी दौरा काढला व लॉर्ड सालसबरी यानी सिव्हिल सर्व्हिस परीक्षेच्या उमेदवाराच्या वयाची मर्यादा १९ वर्षापर्यंत खाली ओढली या प्रतिगामी धोरणाविरुद्ध लोकमत त्यानी जागृत केले. सिव्हिल सर्व्हिसच्या प्रश्नाबाबत सर्व हिंदुस्थानतर्फे कॉमन्स सभेला एक अर्ज पाठविण्याचीही त्यानी तयारी केली.

यावेळी लॉर्ड लिटनने आपल्या प्रतिगामी कारकीर्दीला सुरुवात केली. आणि १८७८ चा व्हर्नाक्युलर प्रेस ॲक्ट, अफगाण युद्ध, १८७७ सालचा दिल्ली दरबार व कापसावरील आयात कराचा यज्ञ इतक्या गोष्टी केल्या. लॉर्ड लिटन यांच्या कारकीर्दीनंतर लॉर्ड रिपन यांचा नव्या युगाला प्रारंभ करून देणारी कारकीर्द सुरू झाली. लॉर्ड रिपनने अफगाणिस्थानच्या अमीराशी तह केला. व्हर्नाक्युलर प्रेस ॲक्ट रद्द केला. स्थानिक

स्वराज्याच्या हक्काची तरफदारी केली व इल्बर्ट बिलाचा पुरस्कार केला. १८८३ साली हे बिल त्यावेळचे हिंदुस्थान सरकारचे कायदेमंत्री मि. इल्बर्ट यानी विचाराकरिता मांडले. युरोपियन व त्याचप्रमाणे अमेरिकन गुन्हेगारांवरील खटल्याची चौकशी करण्याच्या बाबतीत हिंदी मॅजिस्ट्रेटना जी मनाई करण्यात आली होती ती रद्द करण्याचा या बिलाचा उद्देश होता. हिंदुस्थानातील अँग्लोइंडियनांना ही गोष्ट आवडली नाही व त्यांची मने प्रक्षुब्ध झाली. गव्हर्नमेंट हाऊसवरील पहारेकऱ्यावर हल्ला करून व्हाईसरॉयला आपल्या ताब्यात घ्यावयाचे व चंदपाल घाटावरील बोटीत त्याला बसवून इंग्लंडला पाठवायचे असा गुप्त कट काही प्रक्षुब्ध अँग्लोइंडियनांनी केला. वरील कायद्यास सरकारने पाठिंबा दिल्यास आपला हा बेत तडीस न्यावयाचा असा या कटवाल्यानी निश्चय केला होता. कलकत्यातीलच पुष्कळ अँग्लोइंडियनानी हा कट रचला होता. १८८३ सालचे मूळचे बिल जवळ जवळ रद्द करण्यात आले. फक्त सेशन जज्ज व डिस्ट्रिक जज्ज यांच्या बाबतीतच तेवढे वरील बिलावरील तत्त्व मान्य करण्यात आले. लॉर्ड रिपन आपली कारकीर्द संपवून परत मातृभूमीस जाण्यास निघाले त्यावेळी हिंदुस्थानातील सर्व हिंदी लोकांनी त्यांना आदरपूर्वक निरोप दिला. हे पाहून इंग्रजांना त्यांच्याबद्दल हेवा वाटला व त्यापैकी पुष्कळांचे डोळे उघडले, ही गोष्ट खरी असेल तर याचा अर्थ काय असे उद्‌गार याप्रसंगी सर ऑकलंड काल्हिन यांनी काढले असे आपल्या पुस्तकात सर सुरेन्द्रनाथ बानर्जी यांनी म्हटले आहे.

इल्बर्ट बिलाच्या बाबतीत अँग्लो इंडियनांचा विजय झाला. आपले जातीय वर्चस्व प्रस्तापित करण्यासाठी व ते कायम ठेवण्यासाठी अँग्लोइंडियनांचा हा प्रयत्न होता. ही गोष्ट हिंदी लोकांच्या लक्षात आल्याशिवाय राहिली नाही. संघटित चळवळीचा कसा उपयोग होतो, याचा धडाच या प्रकरणापासून हिंदुस्थानातील सार्वजनिक कार्यकर्त्यांना शिकावयास मिळाला व यानंतर थोड्याच दिवसांनी १८८३ साली कलकत्ता येथील आल्बर्ट हॉलमध्ये एक राजकीय परिषद भरविण्यात आली. सुरेंद्रनाथ बानर्जी व

ए. एम्. बोस या परिषदेला हजर होते. सुरेंद्रनाथ बानर्जींनी दिल्ली येथील संमेलनाची आठवण या परिषदेतील श्रोत्यांना करून दिली. या परिषदेस हजर असलेल्या लोकांना एक नवीनच प्रकाश व स्फूर्ती मिळाली. असे मि. अंबिकाचरण मुजुमदार यानी आपल्या पुस्तकात म्हटले आहे. याच्या पुढच्या साली कलकत्ता येथे आंतरराष्ट्रीय प्रदर्शन भरले. इंडियन नॅशनल कॉंग्रेसची मूळस्फूर्ती या प्रदर्शनापासून मिळाली, असे रे. जॉन मरडॉक यांनी म्हटले आहे. १८-१ साली मद्रास महाजन सभा प्रस्थापित झाली व मद्रास येथे प्रांतिक परिषद भरविण्यात आली आणि इकडे पश्चिमेकडे मेथा, तेलंग व तय्बजी यांनी १८८५ च्या ३१ जानेवारीला बॉंड प्रेसिडेन्सी असो. स्थापन केली.

## अखिल भारतीय धर्तीची संघटना निर्मितीची आवश्यकता

या सर्व घटनावरून कोणत्या तरी धर्तीची अखिल भारतीय संघटना निर्माण केली पाहिजे अशी आवश्यता हिंदुस्थानाला भासू लागली होती, ही गोष्ट स्पष्ट आहे. अखिल भारतीय राष्ट्रीय सभेची कल्पना प्रथम कोणाच्या डोक्यात आली हे एक अगम्य गूढ आहे. १८७७ सालचा बडा दरबार व कलकत्त्यातील आंतरराष्ट्रीय संमेलन पाहून राष्ट्रीय परिषदेची कल्पना काही लोकांच्या मनात आली. असे ज्याप्रमाणे म्हणण्यात येते त्याचप्रमाणे १८८४ च्या डिसेंबरमध्य मद्रास येथे भरलेल्या थिऑसॉफिकल कन्व्हेन्शनंतर १७ गृहस्थांची एक सभा झाली व त्या मंडळींना ही कल्पना सुचली असेही म्हणतात. सिव्हिल सर्व्हिसमधून रिटायर्ड झाल्यानंतर मि. डेव्हिड ह्यूम यांनी जी इंडियन युनियन स्थापन केली तीच कॉंग्रेस कॉंग्रेस भरविण्याच्या कामी कारणीभूत झाली अशीही काही लोकांची कल्पना आहे. कॉंग्रेसची मूळ कल्पना कशावरूनही सुचलेली असो किंवा ती कोणीही काढलेली असो. वरील सर्व घटना पाहून आपण अशा एका निर्णयाला येऊन पोहोचतो की, हिंदुस्थानच्या वातावरणातच ती कल्पना

वावरत होती व असल्या संघटनेची जरूरी लोकांना भासू लागली होती. अशावेळी मी आक्टाव्हियन ह्यूम यांनी पुढाकार घेतला व १८८५ च्या मार्चमध्ये त्या सालच्या डिसेंबरात पुणे येथे इंडियन नॅशनल युनियनचे पहिले अधिवेशन भरविण्याची पहिली नोटीस प्रसिद्ध झाली. अशा रितीने जी अव्यक्त कल्पना वातावरणात सामान्यतः वावरत होती व हिंदुस्थानातील पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर भागातील विचारी लोकांच्या मनावर जिने पगडा बसवला होता त्या कल्पनेला निश्चित स्वाध्य प्राप्त झाले व ती सत्यसृष्टीत उतरली.

राजकीय गुलामगिरीच्या या जाणिवेने व राजकीय खळबळाटानीच केवळ कॉंग्रेसला जन्म दिला नाही तर कॉंग्रेस ही राजकीय ध्येयाने प्रेरित झाली होती.

राष्ट्रीय पुनरुज्जीवनाच्या चळवळीचाही पुरस्कार करीत होती. कॉंग्रेसच्या जन्मापूर्वी ५० वर्षावर देशात राष्ट्रीय पुनरुज्जीवनाच्या कार्याला आरंभ झाला होता. विविध स्वरुपाचे हिंदी राजकीय जीवन हे राजा राममोहन राय यांच्या काळातच क्षुब्ध झाले होते. राजा राममोहन राय हे भारतीय राष्ट्रीयत्वाचे पैगंबर व अर्वाचीन भारत वर्षाचे एका अर्थाने जनक होत. देशाच्या त्यावेळच्या धार्मिक व सामाजिक सुधारणांकडे त्यांचे विशेष लक्ष होते. तरी राष्ट्रावर होणाऱ्या भयंकर अन्यायाची त्याना तीव्र जाणीव होती व या अन्यायाचा त्वरित परिहार करण्याकरिता ते जोराचा प्रयत्नही करीत होते. राम मोहन राय हे १७७६ साली जन्मले व १८३३ साली ब्रिस्टल येथे मरण पावले. सतीचो चाल बंद करण्याच्या कामी त्यांनी पुढाकार घेतला व हिंदुस्थानात पाश्चात्य शिक्षण देण्याला सुरवात करण्याच्या कामीही त्यांचे प्रयत्न कारणीभूत झाले. आपल्या आयुष्याच्या शेवटच्या दिवसात इंग्लंडला जाण्याचे त्यांनी ठरविले. स्वातंत्र्यासंबंधीचे त्यांचे प्रेम अलोट होते. केप ऑफ गुड होपला पोहचल्यानंतर फ्रेंच बोटीमधून प्रवेश करण्याचा त्यांनी आग्रह धरला व या बोटीवरील स्वातंत्र्याचा ध्वज जेव्हा त्यांनी पाहिला तेव्हा स्वातंत्र्य ध्वजाचा विजय असो असा त्यांनी जयजयकार केला. मोंगल बादशहाचा वकील म्हणून ते जरी लंडनला गेले होते, तरी

त्यांनी हाऊस ऑफ कॉमन्सच्या कमिटीपुढे हिंदी लोकांची गाऱ्हाणी मांडली. हिंदुस्थानातील सारा वसूल करण्याची पद्धती आणि हिंदुस्थानची आर्थिक स्थिती या विषयावरील तीन निबंध त्यांनी कमिटीपुढे सादर केले. ईस्ट इंडिया कंपनीने त्यांना सार्वजनिक मेजवानी देऊन गौरव केला. १८३२ साली पार्लमेंटपुढे चार्टर अॅक्ट संबंधाने विचार चालू होता आणि हे बिल पास झाले नाही तर आपण ब्रिटीश साम्राज्याचा त्याग करू व अमेरिकेत जाऊन राहू अशी त्यांनी प्रतिज्ञा केली होती. राम मोहन राय यांच्या काळात हिंदुस्थानातील मुद्रण स्वतंत्र्याची गळचेपी करण्यात आली होती. लॉर्ड हेस्टिंग्ज नंतर हंगामी गव्हर्नर झालेल्या मि. जॉन अॅडेम याने वर्तमानपत्रावर कडक निर्बंध घातले व सरकारच्या कारभारावर टीका केली म्हणून कलकत्ता जर्नलचा संपादक मि. बँकिंग हॅम व दुय्यम संपादक मि. सॅन्फॉर्ड यांना हद्दपार केले. अॅग्लो इंडियन व हिंदी या दोन्ही वर्तमानपत्रावर त्याने कडक सेन्सारशिप ठेवली व वर्तमानपत्र सुरू करावयाचे झाल्यास त्याच्या प्रकाशकाने व मालकाने गव्हर्नर जनरलकडून लायसेन्स घेतले पाहिजे असा नियम केला. या प्रेस ऑर्डिनन्सविरुद्ध राममोहन राय यांनी वकील देऊन कोर्टात काम चालविले पण त्यात त्यांना यश आले नाही. इंग्लंडच्या राजाकडे त्यांनी या बाबतीत एक सार्वजनिक अर्जही केला पण त्याचाही काही उपयोग झाला नाही. राममोहन राय यांनी पेरलेले हे बी फुकट मात्र गेले नाही. १८३५ साली सर चार्लस मेटकाफ यानी वर्तमानपत्रावरील सर्व निर्बंध काढून टाकले. सतीची चाल रद्द करण्यात आली. तेव्हा त्या कायद्याविरुद्ध राममोहन राय यांच्या प्रतिस्पर्ध्यांनी केलेले अपील पार्लमेंटाने फेटाळून लावले व पुढे चार्टर अॅक्टही पास झाला हे पाहून राजा राममोहन राय यांच्या मनाचे समाधान झाले.

## धार्मिक व सामाजिक चळवळी

१८५७ चे बंड मोडल्यानंतर १८५८ साली हिंदुस्थानात विश्वविद्यालये व हायकोर्ट स्थापन करण्यात आली. १८६१ ते १८६३ च्या दरम्यान कायदे

मंडळेही निर्माण करण्यात आली. बंडाच्या अगदी थोडे अगोदर विधवा-विवाहाचा कायदा पास झाला होता. १८६० चे सुमारास हिंदुस्थानात पाश्चात्य वाङ्मयाचा व शिक्षणाचा निकट परिचय होऊ लागला. पाश्चात्य पद्धतीवर न्यायदानाच्या संस्था स्थापण्यात आल्या व पार्लमेंटरी पद्धतीने कायदे करणारी कायदेमंडळेही निर्माण झाली, यामुळे हिंदुस्थानात एका नव्या युगालाच प्रारंभ झाला आणि ज्या हिंदी लोकांचा या संस्थांशी संबंध आला त्यांच्यावर पाश्चात्य संस्कृतीचा गाढ परिणाम झाल्याशिवाय राहिला नाही.

राजा राममोहन राय यांनी ब्राह्मोसमाज स्थापन करून सुरू केलेल्या धार्मिक बीजारोपणाचा त्यांच्या मरणानंतर जोराने प्रसार होऊ लागला राजा राममोहन राय यांचे कार्य पुढे चालविणारे ब्राह्मोसमाजाचे, त्यावेळी मुख्य संचालक केशवचंद्र सेन यांनी आपल्या मुलीचा कुचबिहारच्या महाराजां-बरोबर बालपणीच विवाह लावून दिला, त्यामुळे ब्राह्मोसमाजात मतभेद होऊन त्यातील पुढारलेल्या स्वतंत्र मतवादी लोकांनी आनंद मोहन घोष यांच्या नेतृत्वाखाली साधारण समाजाची प्रथापना केली. हेच आनंद मोहन घोष १८९८ साली काँग्रेसचे अध्यक्ष झाले हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. ब्राह्मो समाज स्थापन होऊन बंगालमध्ये सुरू झालेल्या धर्मसुधारणेच्या चळवळीचा परिणाम हिंदुस्थानातील इतर प्रांतावरही झाला. पुण्यात न्या. महादेव गोविंद रानडे यांच्या नेतृत्वाखाली प्रार्थना समाज स्थापण्यात आला. महादेव गोविंद रानडे हे सामाजिक सुधारणेच्या चळवळीचे संस्थापक होते. आणि ही चळवळ काँग्रेसच्या चळवळीबरोबरच उपचळवळ म्हणून कित्येक वर्षं चालू होती. त्याचप्रमाणे पंजाबमध्ये स्थापन झालेला आर्यसमाज व मद्रासमध्ये सुरू झालेली थिऑसफीची चळवळ या सर्व चळवळी चढाईच्या स्वरूपाच्या व प्रागतिक होत्या. राष्ट्रीय पुनरुज्जीवनाच्या कार्यात स्वामी विवेकानंदानी स्थापन केलेल्या रामकृष्ण मिशनने बरीच महत्वाची कामगिरी केली आहे.

हिंदुस्थानात याप्रमाणे सर्वत्र धार्मिक व सामाजिक दृष्टीने पुढारलेल्या चळवळी चालू असतानाच इंडियन नॅशनल काँग्रेस स्थापण्याची कल्पना प्रादुर्भूत झाली. कलकत्यातील इंडियन असोसिएशन, मुंबईची प्रेसिडेन्सी

असोसिएशन व मद्रासची महाजन सभा यासारख्या प्रांतिक संस्थांनी राजकीय प्रश्नाचा विचार करावा व ऑ. इ. नॅशनल युनियनने सामाजिक प्रश्नांच्या बाबतीत आपली सर्व शक्ती केंद्रभूत करावी अशी मि. ह्यूम यांची मूळची कल्पना होती. नुकतेच व्हाइसरॉय होऊन आलेल्या लॉर्ड डफरीन साहेबांना त्यांनी याबाबतीत सल्ला विचारला. या व्हाईसरायनी कशा प्रकारचा सल्ला दिला याची हकीकत १८९८ साली प्रसिद्ध झालेल्या इंडियन पॉलिटिक्स या पुस्तकाच्या प्रस्तावनेत मि. डब्ल्यू. सी. बानर्जी यांनी पुढीलप्रमाणे दिली आहे.

## लॉर्ड डफरीन यांचा पुढाकार

इंडियन नॅशनल कॉंग्रेस ज्या धोरणाने स्थापन करण्यात आली व ज्या धोरणाने तिचे काम आजपर्यंत चालू आहे, त्याच्या मुळाशी खरोखर त्या वेळचे गव्हर्नर जनरल डफरीन होते ही गोष्ट पुष्कळांना अजब वाटेल. इंडियन नॅशनल कॉंग्रेसने सामाजिक प्रश्नांचा विचार करावा व राजकीय प्रश्नांचा विचार प्रांताप्रांतातल्या राजकीय संस्थांनी करावा आणि प्रांतांनी या कामाकरिता भरविलेल्या परिषदेचे अध्यक्षस्थान त्या त्या प्रांतांच्या गव्हर्नरांना द्यावे, म्हणजे अधिकारी वर्ग व बिनसरकारी हिंदी राजकीय पुढारी यांच्यात परस्पर आदर व प्रेम वाढेल या कल्पनेने भारून जाऊन मि. ह्यूम यांनी १८८५ च्या प्रारंभी सिमला येथे व्हाईसरायांची मुलाखत घेतली. व्हाईसरॉयांनी मोठ्या आस्थेने या प्रश्नांचा विचार केला. मि. ह्यूम यांची योजना फारशी उपयुक्त होईल असे त्यांना वाटले नाही. इंग्लंडमध्ये ज्याप्रमाणे एक सरकार विरोधी पक्ष असतो व तो अशाप्रकारची कामे करतो तसली कामे करणारा पक्ष हिंदुस्थानात नाही. लोक मताचे निदर्शन करण्याचे काम जरी वर्तमानपत्रे प्रामाणिकपणे करीत असतात, तरी त्यांच्यावर विश्वास ठेवता येत नाही. लोकांना आपल्या धोरणासंबंधाने काय वाटते हे इंग्रजांना समजत नाही. अशा परिस्थितीत राजकारणाचा विचार करणाऱ्या हिंदी गृहस्थांनी वर्षातून एकदा एकत्र जमावे व प्रचलित राज्यकारभारात कोणते दोष आहेत व ते कसे सुधारावे, हे त्यांनी दाखवून द्यावे. या सभेचे अध्यक्ष प्रांताचे गव्हर्नर असू नयेत

कारण त्यांच्या समोर लोकांना आपल्या मनातले विचार मोकळेपणाने मांडता यावयाचे नाहीत. मि. ह्यूम यांना लॉर्ड डफरीन यांचे हे म्हणणे पटले व त्यांनी आपली स्वतःची व लॉर्ड डफरीन यांची अशा दोन्ही योजना कलकत्ता, मुंबई, मद्रास व इतर प्रांतातील पुढारी यांच्या पुढे मांडल्या व लॉर्ड डफरीन यांची योजना एकमताने मान्य करण्यात आली व तिची अंमलबजावणीही करण्याचे ठरविण्यात आले. वरील कल्पना आपण सुचविली ही गोष्ट आपली हिंदुस्थानांतील कारकीर्द संपेपर्यंत गुप्त राखावी. ती बाहेर फोडू नये. अशी अट लॉर्ड डफरीन यांनी मि. ह्यूम याना घातली होती व ही त्यांची अट प्रामाणिकपणे पाळण्यांत आली. १८८५ च्या नाताळात पुणे येथे हिंदुस्थानांत सर्व भागातील प्रतिनिधींची एक परिषद भरविण्याचे मार्च १८८५ मध्ये ठरविण्यांत आले व त्याप्रमाणे पुढील आशयाचे एक सर्क्युलरही काढण्यांत आले– इंडियन नॅशनल युनियनची परिषद पुणे येथे ता. २५ ते ३१ डिसेंबरमध्ये भरेल. बंगाल, मुंबई, मद्रास वगैरे सर्व भागांतील इंग्रजी भाषेशी पूर्ण परिचय असलेले हिंदी राजकीय पुढारी या परिषदेला प्रतिनिधी म्हणून हजर राहतील. या परिषदेचे प्रत्यक्ष हेतू पुढीलप्रमाणे आहेत.

१) राष्ट्रीय प्रगतीच्या कार्यात चळवळीने काम करणाऱ्या लोकांचा व्यक्तिशः परिचय व्हावा.

२) पुढील वर्षभर ज्या राजकीय चळवळी करावयाच्या त्या संबंधाने चर्चा करून त्यांना निश्चित स्वरूप द्यावे.

या परिषदेला अप्रत्यक्षरीत्या नेटिव्ह पार्लमेंटचे स्वरूप प्राप्त होईल आणि योग्य त्या धोरणाने परिषदेचे काम चालविल्यास कोणत्याही प्रकारची प्रतिनिधिक संस्था चालविण्यास हिंदुस्थान सर्वस्वी नालायक आहे, या त्याच्यावर असलेल्या आक्षेपाला तो बिनतोड उत्तर देईल.

या वर्षाची परिषद पुण्यासच भरावयाची असल्याने सार्वजनिक सभेची श्री. चिपळूणकर प्रभृती मंडळीच स्वागत मंडळाचे काम करतील. परिषदेला आलेले प्रतिनिधी परिषदेच्या कामाकरिता पुण्यास असेपर्यंत वाहनांची, जेवणाखाण्याची व राहण्याची वगैरे सर्व व्यवस्था स्वागतमंडळ करील व

त्याकरिता प्रतिनिधींना कोणत्याही प्रकारचा खर्च पडणार नाही.

पुण्याचे प्रतिनिधीखेरीज करून मुंबई इलाखा (सिंध व वऱ्हाडमिळून) मद्रास वलोअर बंगाल या प्रांतांना २० व नॉर्थवेस्ट प्रॉव्हिन्स, आंध्र व पंजाब यांना प्रत्येकी १० प्रतिनिधी परिषदेला पाठविता येतील.

काँग्रेस भरविण्याच्या कामी मि. ह्यूम यांनी व्हाईसरॉयांची शुभेच्छा संपादन करून घेतल्यानंतर ते इंग्लंडला गेले व लॉर्ड रिपन, लॉर्ड डलहौसी, सर जेम्स केअर्ड, जॉन ब्राईट, मि. रीड, मि. स्लॅग वगैरे प्रमुख मंडळींचा त्यांनी याबाबतीत अगाऊ सल्ला घेतला व त्यांची संमतीही मिळविली.

मिसेस बेझंट यांनी आपल्या 'हाऊ इंडिया थॉट फॉर फ्रिडम,' या पुस्तकात काँग्रेसच्या या अधिवेशनाचे यथार्थ वर्णन केले आहे.

## पहिले अधिवेशन

नाताळापूर्वी अगदी थोडे दिवस पुण्यात कॉलऱ्याच्या साथीला सुरुवात झाली. त्यामुळे ही पहिली काँग्रेस मुंबईस भरविण्याचे ठरविण्यात आले. गोकुलदास तेजपाल संस्कृत कॉलेजच्या सर्व सुंदर इमारती व त्याचे वसतिगृह काँग्रेसच्या स्वागत मंडळाच्या स्वाधीन केले. आणि २७ डिसेंबर सकाळपूर्वी काँग्रेस भरविण्याची सर्व प्रकारची जय्यत तयारी करण्यात आली. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या चळवळीत ज्यांनी पुढे आपले नाव गाजविले अशी कितीतरी नामांकित मंडळी या परिषदेला हजर होती. मद्रासचे डेप्युटी कलेक्टर व सुधारकाग्रणी दि. ब. रघुनाथराव, पुण्याच्या स्मॉल-कॉज कोर्टाचे त्या वेळचे जज्ज व पुढे हायकोर्टाचे जज्ज झालेले न्या. महादेव गोविंद रानडे, हे त्या वेळच्या कायदे मंडळाचेही सभासद होते. आग्र्याचे विद्वान लेखक लाला बैजनाथ, प्रो. के. सुंदरम व आर. जी. भांडारकर वगैरे मंडळी या काँग्रेसला हजर होती. पण त्यांना परिषदेचे प्रतिनिधी म्हणून तिच्या कामात भाग घेता आला नाही. ज्ञानप्रकाश, पुणे सार्वजनिक सभेचे त्रैमासिक, मराठा, केसरी, नवविभाकर, इंडियन मिरर, नासीम, हिंदुस्थानी, ट्रिब्यून, इंडियन युनियन, स्पेक्टेटर, इंदुप्रकाश, हिंदू, क्रिसेंट वगैरे पत्रांचे संपादक तसेच सिमल्याहून मि. ह्यूम,

कलकत्याचे डब्ल्यू. सी. बानर्जी, नरेंद्रनाथ सेन, पुण्याचे डब्ल्यू. एस. आपटे व जी. जी. आगरकर, गंगाप्रसाद वर्मा (लखनो), दादाभाई नौरोजी, तेलंग, मेथा. वाच्छा, कलबारी, चंदावरकर (मुंबई) मद्रास महाजनसभेचे अध्यक्ष रंगय्या नायडू, एस. सुब्रह्मण्य अय्यर, पी. आनंदाचार्य, जो. सुब्रह्मण्य अय्यर, वीर राघवाचारीयर, केशव पिले वगैरे मंडळी प्रतिनिधी म्हणून या परिषदेला हजर होती.

ता. २८ डिसेंबर १८८५ रोजी दोन प्रहरी बारा वाजता गोकुलदास तेजपाल संस्कृत कॉलेजमध्ये काँग्रेसच्या अधिवेशनास सुरुवात झाली. मि. डब्ल्यू. सी. बानर्जी हे या पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्ष होते. मि. ह्यूम, मि. एस. सुब्रह्मण्य अय्यर, ऑ. के. टी. तेलंग यांची परिषदेत पहिली भाषणे झाली. अध्यक्षांनी आपल्या भाषणात काँग्रेसच्या ध्येय्यासंबंधाने विस्तृत विवेचन केले. या परिषदेत पुढील नऊ ठराव पास झाले.

१) हिंदुस्थानच्या राज्यकारभारासंबंधाने चौकशी करण्याकरिता रॉयल कमिशन नेमावे. २) इंडिया कौन्सिल रद्द करावे. ३) कायदेमंडळात लोकनियुक्त सभासद घ्यावे. प्रश्न विचारण्याचा हक्क असावा. पंजाब, वायव्येकडील प्रांत, औंध यांना कायदेमंडळे द्यावी कौन्सिलातील बहुसंख्य पक्षाने केलेल्या तक्रारींचा विचार करण्याकरिता हाऊस ऑफ कॉमन्समध्ये स्टँडिंग कमिटी नेमण्यात यावी. ४) आय. सी. एस. च्या परीक्षा इंग्लंड व हिंदुस्थान या दोन्ही ठिकाणी एकाच वेळी घ्याव्या. ५)-६) लष्करावरील खर्चासंबंधाने एका ठरावात विचार करण्यात आला होता. ७) अप्पर ब्रह्मदेश खालसा करून तो हिंदुस्थानला जोडण्याचा जो विचार चालू आहे त्याचा निषेध दुसऱ्या एका ठरावाने करण्यात आला. ८) देशांतील प्रांतिक संस्थांकडे काँग्रेसमध्ये पास झालेले ठराव पाठवावे व या संस्थांनी ठिकठिकाणी सभा भरवून काँग्रेसच्या ठरावाला मान्यता द्यावी. ९) १८८६ च्या ता. २८ डिसेंबरमध्ये काँग्रेसचे अधिवेशन कलकत्ता येथे भरवावे हा शेवटचा ठराव होता.

# होमरुल लीगचे यशापयश व जातीय चळवळी

## होमरुल लीग

लो. टिळक मंडाले तुरुंगातून हद्दपारीची शिक्षा भोगून (१९०८ १९१४) आल्यावर त्यांनी ब्रिटिशांच्या युद्ध प्रयत्नास सहाय्य केले. अनिबेझंट यांनी पण ब्रिटिशांच्या युद्ध प्रयत्नात मदत केली. लो. टिळकांना कॉंग्रेसमध्ये प्रवेश मिळावा म्हणून ॲनी बेझंटबाईंनी १९१४ पासून प्रयत्न करावयास सुरुवात केली. १९१५ च्या मुंबई कॉंग्रेसमध्ये जहालांना कॉंग्रे प्रवेशास परवानगी दिली त्याप्रमाणे कॉंग्रेस घटना दुरुस्त करून १९१६ च्या लखनौ कॉंग्रेस अधिवेशनात लो. टिळकांना कॉंग्रेस प्रवेश देण्यात आला. याच १९१६ च्या लखनौ कॉंग्रेसमध्ये कॉंग्रेस लीग योजना संमत करण्यात आली.

इ स १९०१ च्या कलकत्ता कॉंग्रेस अधिवेशनात मि. स्मेडले यांनी आयरिश होमरूलप्रमाणे इंडियन होमरूल लीग सुरू करावी असा सल्ला हिंदी लोकांना दिला होता. इंग्लंडमधील होमरूल लीगमध्ये रेडमंड यांचे कार्य पाहून ॲनी बेझंटबाई प्रभावित झाल्या होत्या. १९१४ त इंग्लंडला जाऊन ब्रिटिश पार्लमेंटमध्ये भारतासाठी होमरूल लीग स्थापन करण्याचा प्रयत्न केला पण त्यात यश आले नाही. महायुद्धात भारताकडून ब्रिटिशांना मिळणाऱ्या मदतीच्या बदल्यात भारताला वसाहतीचे स्वराज्य देण्यात यावे असे ॲनी बेझंटबाईंनी लंडनमधील जाहीर सभेत प्रतिपादले. भारतात परत आल्यावर 'न्यू इंडिया' दैनिक व 'कॉमनविल' साप्ताहिक वृत्तपत्रे जोरात चालवून होमरूल लीगचा प्रचार केला व सप्टेंबर १९१५ त होमरूल लीगची स्थापना केली. १९१५ च्या मुंबई अधिवेशनात बेझंटबाईनी होमरूल लीग-संबंधी ठराव मांडला. पण क्रमाक्रमाच्या सुधारणांद्वारा वसाहतीचे स्वराज्य

ह्या काँग्रेस ध्येयाशी होमरूल लीगचे धोरण सुसंगत नसल्याने काँग्रेसने मान्यता दिली नाही. काँग्रेस मान्यतेवर अवलंबून न रहाता बेझंटबाईंनी होमरूल लीगची संघटना केली. बेझंटबाईंची आंतरराष्ट्रीय ख्याती, प्रभावी वक्तृत्व आणि व्यक्तिमत्व, थिऑसॉफीचे सूत्रधारकत्व यांमुळे अनेक लोक होमरूल लीगमध्ये सामील झाले. व पं. मोतीलाल नेहरू, चिंतामणी, सर सपू. बॅ. जिना, सरोजिनी नायडू इ. अनेक नेत्यांना बेझंटबाईंनी आपल्या प्रभावी व्यक्तिमत्वाच्याद्वारे होमरूल लीगमध्ये खेचून घेतले. काँग्रेसच्या सर्व माजी अध्यक्षांनी त्यांच्या होमरूल लीगला पाठिंबा दिला. मुंबई, अलाहाबाद, कानपूर, वाराणसी, मथुरा, कालीकत, मद्रास इ. ठिकाणी होमरूल लीगच्या शाखा उघडल्या.

## लो. टिळकांचा सहभाग

डिसेंबर १९१५ च्या मुंबईच्या प्रांतिक नॅशनॅलिस्ट कॉन्फरन्समध्ये नेमलेल्या १५ जणांच्या समितीने केलेल्या शिफारशी विचारात घेऊन लो. टिळकांनी एप्रिल १९१६ साली बेळगाव येथे मुंबई प्रांत, वऱ्हाड व मध्यप्रदेश एवढ्या प्रांतापुरती मर्यादित होमरूल लीग स्थापन केली. बाप्टिस्टा, केळकर, खापर्डे, मुंजे, करंदीकर इ. होमरूल लीगच्या कार्यकारिणीत आले. होमरूल लीगचे स्पष्टीकरण करताना लो. टिळक म्हणाले, होमरूल प्राप्तीचा अर्थ इंग्लिश राज्याचा नाश असे नव्हे. होमरूल म्हणजे प्रत्येक क्षणी व प्रत्येक पावलोपावली हिंदी लोकांना अडथळा करणाऱ्या केवळ नोकरशाहीचा नाशच होय. परराष्ट्रीयसंबंध इंग्लंडला देऊन अंतर्गत राज्यकारभारात हिंदी लोकांना स्वायत्तता असावी. लो. टिळकांना बेझंटबाईप्रमाणेच होमरूल शब्दाचा वसाहतीचे स्वराज्य हा अर्थ अभिप्रेत होता. महायुद्धाच्यावेळी ब्रिटिश साम्राज्यावर आलेल्या संकटाच्यावेळी ब्रिटिशांच्या पाठीशी राहिल्याने आपल्या स्वराज्याच्या मागणीस बळकटी येते, महायुद्धामुळे ब्रिटिशांवर आलेले संकट ही आपली स्वराज्यमागणीची सुसंधी आहे. असे ॲनी बेझंट व लो. टिळक या दोघांना वाटे. १९१६ च्या

लखनौ काँग्रेस अधिवेशनानंतर लो. टिळक व अॅनी बेझंट यांनी अनुक्रमे महाराष्ट्रात व मद्रास प्रांतात काँग्रेस लीग योजनेतील स्वराज्याचे ध्येय लोकप्रिय करण्यासाठी जोराचा प्रचार केला. ' स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे व तो मी मिळवीनच ' अशी घोषणा लो. टिळकांनी लोकप्रिय बनविली.

## होमरुल लीगच्या चळवळीचा जोर आणि अवकळा

होमरुल चळवळीमुळे प्रांतिक सरकारला भीती वाटली. मे १९१६ त ' न्यू इंडिया ' पासून २००० रु. ची ठेव मागितली. २८ ऑगस्ट १९१६ रोजी ती जप्त केली. परत १०,००० रु. ठेव मागण्यात आली ती दिली. बेझंटबाईनी ती मद्रास हायकोर्टात व नंतर प्रिव्ही कौन्सिलकडे अपील केले पण यश मिळाले नाही. मे १९१६ मध्ये बेळगाव व नगर येथील होमरुल लीग सभेपुढे आक्षेपार्ह भाषण केल्याबद्दल लो. टिळकांपासून प्रत्येकी १०००० रु. याप्रमाणे २०००० रुपयांचे दोन बॉन्ड चांगल्या वागणुकीबद्दल लिहून मागितले पण मुंबई हायकोर्टाने लो. टिळकासंबंधीची ही आज्ञा रद्द करविली अॅनी बेझंटबाई यांना मुंबई प्रांतात व मध्य प्रांतात प्रवेश करण्यास मनाई केली. (जून १९१६) पंजाबप्रांतात व दिल्लीत प्रवेश करण्यास बिपिनचंद्र पाल व लोकमान्य टिळक यांना मनाई करण्यात आली. (फेब्रुवारी १९१७) होमरुल लीगच्या सभास हजर राहण्यास मनाई करणारे परिपत्रक शाळा व कॉलिजांकडे पाठविण्यात आले. मद्रास सरकारने बेझंटबाई व त्यांचे सहकारी वाडिया, अरूंडेल यांना उटकमंड येथे स्थानबद्ध केले. (जून १९१७) देशात सर्वत्र निषेध सभा भरविण्यात येऊन अनेक नेत्यांनी होमरुल लीगचे सभासदत्व मुद्दाम स्वीकारले. जुलै १९१७ च्या ऑ. इं. काँग्रेस कमिटीने होमरुल लीगच्या कार्याची प्रशंसा केली. ऑगस्ट १९१७ त अॅनी बेझंटबाईची काँग्रेस अध्यक्षपदावर नियुक्ती केली. याचवेळी जुलै, १९१७ त मेसापोटेमिया प्रश्नावर चेंलिन यांना भारत मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागला, मॉन्टेग्यू यांना भारतमंत्री नेमण्यात आले. भारताची युद्धप्रयत्नात मदत मिळविण्यासाठी २० ऑगस्ट १९१७ रोजी मॉन्टेग्यू यांनी इतिहास

प्रसिद्ध घोषणा केली. युद्ध संपेपर्यंत राजकीय चळवळीत हिंसक असदनशीर मार्ग अवलंबणार नाही व भारतमंत्री माँटेग्यूच्या भारताच्या भेटीत शांतता ठेवतील या अटीवर बेझंट व त्यांचे दोन साथीदारांना काँग्रेस अधिवेशना अगोदर मुक्त केले. १९१७ चे वर्ष होमरुल लीगच्या दृष्टीने सनसनाटीचे गेले. मग मात्र होमरुल लीगला अवकळा आली.

होमरुललीगच्या नाशांची कारणे– १) अर्जविनंत्या, शिष्टमंडळे या मार्गाचा धिक्कार करणारे लोक, टिळक, ॲनी बेझंट, बिपीनचंद्र पाल इ. नी धिक्कारलेल्या नेमस्तांच्या मार्गाचा अवलंब केला. लो. टिळक व ॲनी बेझंट हे लॉर्ड माँटेग्यूच्या भारत भेटीत त्यांना दिल्लीस जाऊन भेटलें. (नोव्हें. १९१७) लो. टिळक व बिपीनचंद्र पाल हे होमरुल लीगचे शिष्टमंडळ घेऊन इंग्लंडला गेले. (सप्टें. १९१८ नोव्हें. १९१९) (२) एकमेकांना सहाय्य करणारे पुण्याचे व मद्रासचे होमरुल नेते आपापसात भांडू लागले. बेझंटबाईनी व फर्ग्युसन कॉलेजचे प्राचार्य र. पु. परांजपे यांनी प्रांतिक काँग्रेस अधिवेशनात लो. टिळकांना विरोध केला. ह्या विरोध सहन न होऊन लो. टिळकांनी ॲनी बेझंट यांना पूतना म्हणून व प्राचार्य परांजपे यांना शिशुपाल (मुले सांभाळणारा) म्हणून संबोधून त्यांची अवहेलना केली. चिडखोर प्रवृत्तीमुळे आपापसात सहकार्य मिळू शकले नाही. (३) ब्राह्मणेतरांचा विरोध :–होमरूल लीग चळबळ म्हणजे ब्राह्मणांची चळवळ अशी समजूत महाराष्ट्रात झाली. होमरुल (स्वराज्य) म्हणजे ब्राह्मणांचे वर्चस्व असलेल्या प्राचीन समाजव्यवस्थेचे पुनर्जीवन अशी मद्रासमध्ये समजूत झाली. होमरूल लीगच्या चळवळीस यश येऊन स्वराज्य मिळाल्यास त्यात ब्राह्मणांचे राज्य येईल अशी कल्पना महाराष्ट्र–मद्रासमधील ब्राह्मणेतरांची होती. होमरूल लीगला प्रतिशह देण्यासाठी ब्रिटिश सरकारने या ब्राह्मणेतरांच्या कल्पनेस उत्तेजनच दिले. होमरूल लीगला असणारा विरोध इंग्लंडमधील जनतेच्या कानी घालावा म्हणून मद्रासमधील जस्टीस पार्टीचे (ब्राह्मणेतरांचा पक्ष) डॉ. नायर व महाराष्ट्र कर्नाटकातील ब्राह्मणेतरांतर्फे (सत्यशोधक) श्री. जाधव यांनी इंग्लंडला प्रयाण केले. (४) प्रांतिक काँग्रेस अधिवेशनात प्रथेनुसार शेतकऱ्यांना विनामूल्य प्रवेश देण्याचे नाकारले

म्हणून नेमस्तांनी ब्राह्मणेतरांशी गट्टी जमवली व लो. टिळकांना विरोध केला. धार्मिक राष्ट्रवादाच्या पुरस्कारामुळे लो. टिळकांना आपल्या आयुष्यात प्रथम मुस्लीम, नंतर नेमस्त व नंतर ब्राह्मणेतर यांचा विरोध सहन करावा लागला. (५) होमरुल लीगच्या चळवळीत नाविन्य असे काहीच नव्हते. होमरुल लीगकडून केली जाणारी स्वराज्याची (वसाहतीचे स्वराज्य) मागणी ही १९०५ नंतरच्या काँग्रेसच्या ध्येयापासून वेगळी नव्हती. होमरूल लीगचे नेतृत्व नंतर नेमस्त बनले व शिष्टमंडळे पाठविण्यासारख्या कार्यक्रमाचा पाठपुरावा होऊ लागला. देशात जेव्हा जहाल असहकाराचा कार्यक्रम आखला जात होता अशावेळी होमरुल लीगने असहकाराच्या कार्यक्रमास सहकार्य केले नाही. निवडणुकांवर व विधीमंडळावर बहिष्कार न घालता प्रतियोगी सहकाराचा अवलंब करून निवडणूका लढविण्यासाठी काँग्रेस डेमॉक्रेटिक पक्षाची स्थापना केली. माँटफर्ड सुधारणा कायदा राबविण्यासाठी काँग्रेसमधून बाहेर पडलेल्या नॅशनल लिबरल फेडरेशनमध्ये होमरुल लीगचे कार्यकर्ते (खापर्डे, केळकर, बिपीनचंद्र पाल, ॲनी बेझंट इ.) नंतर सामील झाले.

६) काँग्रेसमध्ये होमरुल लीग स्थापन केल्यास काँग्रेस पक्षाचा जोम कमी होईल. स्वराज्याची (होमरुलची) मागणी काँग्रेस पक्षामार्फतही होऊ शकते-या कारणावरून १९१५ च्या मुंबई काँग्रेसमध्ये होमरुल लीग स्थापन करण्या-करण्यासंबंधीच्या ॲनी बेझंटच्या शिफारसीस मान्यता दिली नाही. काँग्रेस पक्षाचा अधिकृत पाठिंबा न मिळाल्याने सरकारने होमरुल लीगसंबंधी दडपशाहीचे धोरण स्वीकारून सामान्य जनतेस चळवळीपासून परावृत्त केले.

७) सामान्य जनतेत होमरुल लीग चळवळ पसरू शकली नाही, कारण होमरुल लीगपक्षावर सरकारची वक्रदृष्टी होती. शिवाय होमरुल लीगचे नेतृत्व धार्मिक राष्ट्रवाद्यांकडे होते. त्यामुळे ब्राह्मणेतरांनी विरोध केला.

८) कारखानदार व भांडवलदारांचा मध्यम वर्ग महायुद्धकालीन उद्योगधंद्यात गुंतलेला होता. सरकारने उद्योगधंद्याना सर्वप्रकारची मदत

द्यावयास सुरुवात केली. इजिप्त, पॅलेस्टाईन, पूर्व आफ्रिका यातील आघाडींना लागणारा माल पुरविण्याची कंत्राटे हिंदी कारखानदारांना व व्यापाऱ्यांना दिली. जपानी व अमेरिकन मालाची बरोबरी करू शकतील असा माल निर्माण करण्यासाठी सरकारने संरक्षक जकाती बसविल्या. हिंदी कापडावर एक्साईज ड्युटी न बसविता ७–३० टक्के आयात कापसावर जकात बसवून हिंदी कापडगिरण्यांना उत्तेजन दिले. या मध्यमवर्गाकडून होमरुल लीगला सहाय्य मिळाले नाही.

९) सुधारणाकायद्यास सहाय्य केल्यामुळे होमरुल लीगमधील लढाऊ राष्ट्रवाद नष्ट झाला. लोकांच्या मनाची पकड घेण्यासारखा कार्यक्रम नंतर होमरुल लीगच्या, अनुयायांनी दिला नाही. म. गांधींच्या असहकार चळवळीने जनमनावर छाप पडली व लोक तिकडे आकर्षित होऊन होमरुल लीगला विसरले. ॲनी बेझंट यांच्याऐवजी म. गांधींना ऑल इंडिया होमरुल लीगचे अध्यक्ष बनविण्यात आले. ऑक्टोबर १९२० ला मुंबईस होमरुल लीगची बैठक भरली, तीत होमरुल लीगचे नाव स्वराज्य सभेत बदलण्यात आले. स्वराज्य सभा कालांतराने नकळत कॉंग्रेसमध्ये विलीन झाली.

# इंडियन नॅशनल लिबरल फेडरेशन

२० ऑगस्ट १९१७ रोजी माँटेग्यू यानी इतिहासप्रसिद्ध घोषणा केल्यानंतर १० नोव्हेंबर १९१७ पासून भारताचा दौरा सुरू केला. दौऱ्यात त्यांनी सर भूपेंद्रनाथ बसू, लॉर्ड सत्येंद्रनाथ सिन्हा इ. नेत्यांची भेट घेऊन सुधारणा राबविण्यासाठी प्रागतिकांची स्वतंत्र संघटना निर्माण करण्याविषयी बोलणी केली. त्याप्रमाणे माँटफर्ड अहवाल प्रसिद्ध व्हावयाचे अगोदर कलकत्त्यात नॅशनल लिबरल लीगची स्थापना करण्यात आली व ऑगस्ट १९१८ मध्ये बंगाल प्रांतिक नॅशनल लिबरल लीगचे अधिवेशनही भरले. मुंबईसही प्रागतिकांनी होऊ घातलेल्या सुधारणांस पाठिंबा दिला. नोव्हेंबर १९१८ त मुंबईस सर्व प्रागतिकांचे अधिवेशन भरून इंडियन नॅशनल लिबरल फेडरेशनची स्थापना झाली.

जुलै १९१८ भारतमंत्री माँटेग्यू व ग. ज. चेम्सफर्ड यांनी संयुक्त अहवाल प्रसिद्ध केल्यानंतर अहवालासंबंधी मत जाहीर करण्यासाठी मुंबईस काँग्रेसचे खास अधिवेशन बोलावण्यात आले. (ऑ. १९१८) त्यात सुधारणा टाकाऊ आहेत असे काँग्रेसने जाहीर केले. मुंबईच्या ह्या खास काँग्रेस अधिवेशनात नेमस्तांनी भाग घेतला नाही. डिसेंबर १९१८ त दिल्लीस काँग्रेसचे नेहमीचे अधिवेशन भरले असता जहालांनी नेमस्तांना नीट वागणूक दिली नाही व नेमस्त गटातील श्रीनिवास शास्त्री (सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीचे सेवक) यांच्या भाषणात वारंवार अडथळा आणला. त्यामुळे नेमस्तांनी काँग्रेसशी असलेला संबंध तोडून टाकून सुधारणा कायदा राबविण्याचा निश्चय केला. महात्मा गांधींनी जालियनवाला हत्याकांड व रौलट कायदा याविरुद्ध जेव्हा असहकाराची चळवळ हाती घेतली यावेळी नेमस्तांनी माँटफर्ड सुधारणानुसार नोव्हेंबर १९२० त घेण्यात आलेल्या निवडणुकात भाग घेतला.

घटनात्मक प्रगतीवर विश्वास होता म्हणून प्रागतिक नेमस्तांनी सुधारणा राबविण्यास सहकार्य केले. सर्वच लोकांनी सुधारणा नाकारल्यास

ब्रिटिश सरकार दिलेल्या सुधारणा परत घेईल व जे पदरात मिळावयाचे तेही मिळणार नाही. असे त्यांना वाटत होते. गांधींचा सत्याग्रह व असहकाराचा कार्यक्रम ज्यांना रुचला नाही असे होमरूल लीगचे कार्यकर्ते (अॅनी बेझंट, बिपीनचंद्र पाल इ.) कॉंग्रेसमधून फुटून प्रागतिकांच्या नॅशनल लिबरल फेडरेशनला मिळाले. कॉंग्रेसने निवडणुका व विधीमंडळ यावर बहिष्कार घातला असल्याकारणाने स्वराज्य पक्षाच्या उदयापर्यंत नॅशनल लिबरल फेडरेशनला निवडणुकात बरेचसे यश मिळाले.

## जातीय चळवळी

१) सत्यशोधक चळवळ व ब्राह्मणब्राह्मणेतर वाद:- समाजातील विषमता नष्ट करावी. ब्राह्मण-भटशाही नष्ट व्हावी, परमेश्वर भक्तीतील मध्यस्थ दूर व्हावा, यासाठी इ स. १८८३ त म. फुल्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. ही चळवळ १८७२ ते १९१० पर्यंतच्या काळात सामाजिक व धार्मिक स्वरूपाची होती. इ. स. १९१० ते १९३० पर्यंतच्या काळात सत्यशोधक समाजाच्या चळवळीस राजकीय व काही अंशी जातीय स्वरूप प्राप्त झाले व १९१० चे नंतर सत्यशोधक चळवळ, ब्राह्मणेत्तर चळवळ नावाने ओळखली जाऊ लागली.

ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाची कारणे- अ) राजकीय कारणे- १) महाराष्ट्र ब्राह्मणांनी संस्थानिकांना क्षत्रियत्व द्यावयाचे नाकारले. कोल्हापूरचे छ. शाहूराजे क्षत्रिय आहेत, तेव्हा त्याचे संस्कार ब्राह्मणाप्रमाणे वैदिक पद्धतीने केले जावेत. असा शाहू महाराजांचा आग्रह होता तर छ. शाहू महाराज क्षत्रिय नाहीत. म्हणून त्यांचे संस्कार वेदोक्त न केले जाता पुराणोक्त केले जावेत असा निर्णय संकेश्वर पीठाच्या शंकराचार्यांनी दिला व लो. टिळक, प्रो. विजापूरकर यांनी तशीच बाजू मांडली. ह्या वेदोक्त वादामुळे (इ. स. १९०१-१९०६) ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादास चालना मिळाली. २) पेशवाईतील ब्राह्मणाचे वर्चस्व- छ. शिवाजी राजांनी स्थापलेले स्वराज्य ब्राह्मण पेशव्यांनी बळकावले अशी ब्राह्मणेतरांची समजूत होती. ब्राह्मणांना पेशवाईत असे वाटू लागले की आता आपणच

राजे आहोत. ब्राह्मणांना विशेष सवलती मिळू लागल्या. इतरांना लागू असलेली कायद्याची बंधने त्यांना लागेनाशी झाली. ब्राह्मणांकरिता दक्षिणा व जेवण यांची भरपूर तरतूद (पेशवे) सरकारने केली. (न्या. रानडे) पूर्वी मानमरातब मिळविणाऱ्या ब्राह्मणेतर सरकारांना ही विषमता पेशवाई काळात जाणवू लागली. तसेच दहशतवादी चळवळीत भाग घेणारेही ब्राह्मण होते. काँग्रेसमधील जहाल राजकारण व महाराष्ट्रातील दहशतवादी चळवळ पेशवाईच्या पुनरुज्जीवनासाठी आहे, अशी ब्राह्मणेतरांची समजूत झाली.

ब) प्रशासकीय कारणे :– ब्राह्मण ब्राह्मणेतर यांच्या आजच्या भांडणाला महत्त्वाचे कारण म्हणजे सरकारी यंत्रणेत ब्राह्मणांना मिळालेला अन्याय्य वाटा ५ टक्के लोकांनी ९५ टक्के जागा अडविल्या आहेत. अशा स्थितीत दोन्ही जमातीत वैरभाव निर्माण न होईल तरच आश्चर्य ! (रावबहाद्दूर काळे, सातारा) सरकारी नोकरीत असलेल्या ब्राह्मणांनी ब्राह्मणेतरांवर जुलूम केले. आजपर्यंत जे सेट मामलेदार झाले त्यापैकी कित्येक आपले काम करीत असता इतके कुनीतीने वागत व गरीबगुरीब लोकांवर जुलूम करीत की त्यांचा एक ग्रंथ होईल. (म. फुले) शिरस्तेदार आपल्या वेतनाइतका खर्च करूनही सालात पाच हजार रु. जवळ करतात. सामान्य कारकूनही दहा वर्षे काम करतो तर दोन हजार रुपये जवळ करितो (लोकहितवादी) ब्राह्मण कामदार आपणाशी बेमुर्वत खोरपणे वागतो व ख्रिस्ती धर्मोपदेशक काळजीपूर्वक चौकशी करतात, ही परस्परविरोधी दृश्ये पाहून साहेब परवडला पण ब्राह्मण नको अशी लोकांची वृत्ती झाली,

(क) शैक्षणिक:– इ. स. १८२८ त धाकजी परभू या सनातन्याच्या चळेखातर मुबई सरकारी मराठी शाळेतून मराठे, कोळी, कुणबी, भंडारी या जातीच्या मुलांना काढून टाकले. इ. स. १८५१ पर्यंत पुण्याच्या पाठशाळेत फक्त ब्राह्मण विद्यार्थी घेतले जात. या शैक्षणिक विषमतेच्या पोटी साताऱ्च्या प्रतापसिंह (१८१९–१८३८) भोसल्यांनी ब्राह्मण ब्राह्मणेतर वाद सुरू केला. छ. शाहू महाराजांपासून आर्थिक सहाय्य मिळवून पुण्याच्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीने (१८८४) छ. शाहू महाराजांना अध्यक्षपद दिले पण वेदोक्त प्रकरणानंतर महाराजांनी सत्यशोधक चळवळीचे

पुनरुज्जीवन करताच शाहू महाराजांचे अध्यक्षपद सोसायटीने नामंजूर केले. त्यामुळे ब्राह्मणब्राह्मणेतर वादास अधिकच चालना मिळाली.

(ड) सांस्कृतिक कारणे:– द. भारतात मलबार व तामीळ भागात ब्राह्मण ब्राह्मणेतरांचे स्वरूप उग्र झाले. तामीळ भाषेत शैव पंथाचे वाङ्मय विपुल आहे. तसेच तामीळ लेखकांनी तामीळ वाङ्मय भरभराटीस आणले. परंतु तामीळ ब्राह्मण तामीळ भाषेस मान देत नाहीत. त्यांच्या सांस्कृतिक व धार्मिक गोष्टीचे उगमस्थान म्हणून ते संस्कृत भाषेकडे पाहतात व संस्कृत भाषेचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न करतात. साहजिकच संस्कृत भाषेचे खूळ असलेले ब्राह्मण ब्राह्मणेतरांच्या द्वेषाचे लक्ष्य बनले.

(इ) सामाजिक कारणे:– मलबारमध्ये संस्थानिकांचे क्षत्रियत्व तेथील ब्राह्मणांनी मान्य केले आहे. त्यामुळे तेथे राजकीय कारण नाही. मलबारमध्ये मातृसत्ताक कुटुंबपद्धती आहे. नायर लोकांतील स्त्री ही मातृप्रधान आहे. तिच्याशी ब्राह्मण संबंध ठेवीत. परंतु नायर पुरुष ब्राह्मण स्त्रीशी संबंध ठेवू शकत नसे. नायर स्त्री व ब्राह्मण पुरुष यात असलेला संबंध हा कायदेशीर वैवाहिक संबंध नाही. हा संबंध कायदेशीर वैवाहिक संबंध मानण्यात यावा अशी मागणी इंग्रजी शिक्षणाच्या प्रभावाखाली आलेल्या नायरांनी ब्राह्मणांकडे केली, पण ब्राह्मणांनी त्यास नकार दिला. म्हणून त्यांनी ब्राह्मणांचा द्वेष सुरू केला. नायरांनी ब्राह्मणेतरांचे नेतृत्व स्वीकारले. मद्रासमधील जस्टीस पार्टीचे नायर, नाडर, मुदलीयार नायडू हे ब्राह्मणेतरांचें नेते होते.

महाराष्ट्रात व मद्रास प्रांतात स्वतःस श्रेष्ठ समजत व इतरांना तुच्छतेने वागवीत. ब्राह्मण कितीही लबाड असले व कितीही दुष्ट असले तरी एक गोष्ट निर्विवाद आहे की ज्ञानभंडाराच्या किल्ल्या त्यांच्या कमरेला आहेत. त्यांच्या साह्याशिवाय इतर जातीस ज्ञानाचा लाभ होण्याचा बहुधा मुळीच मार्ग नाही. (विष्णूशास्त्री चिपळूणकर)

ब्राह्मणेतरांनी होमरूल लीगला विरोध केला कारण होमरूलचे नेतृत्व ब्राह्मणाकडे होते. होमरूल लीग नेत्यांच्या हाती सत्ता देणे म्हणजे ब्राह्मणाचे हाती सत्ता देणे होय. ब्राह्मणांचे राज्य म्हणजे विषमतेचे, विटाळ–शिवाशिवीचे राज्य सुरू होणे अशी ब्राह्मणेतरांची कल्पना होती.

## जस्टिस पार्टीची स्थापना

ब्राह्मणेतर बहुसंख्य आहेत या सबबीवर मॉंटफर्ड अहवालाने ब्राह्मणेतरांना स्वतंत्र मतदारसंघ देण्यास किंवा संयुक्त मतदारसंघात काही जागा राखून ठेवण्यास नकार दिला. ब्राह्मणेतर बहुसंख्य असले तरी प्रौढ मताधिकार नसल्याने ब्राह्मणेतर निवडून येण्याची हमी नव्हती म्हणून ब्राह्मणेतरांनी जोराचा विरोध केला व मद्रासमध्ये जस्टिस पार्टीची स्थापना करून चळवळ सुरू केली. आपली बाजू मांडण्यासाठी मद्रासमधून डॉ. नायर व महाराष्ट्र–कर्नाटकातून श्री. भास्करराव जाधव इंग्लंडला गेले. त्यांना यश येऊन बहुप्रतिनिधी मतदार संघात ब्राह्मणेतरांसाठी काही जागा राखून ठेवल्या गेल्या. मुंबई विधिमंडळात मॉंटफर्ड सुधारणांनुसार ब्राह्मणेतरांना सात राखीव जागा मिळाल्या. मद्रास प्रांतात १९२०, १९२३ व १९२६ च्या निवडणुकांत ब्राह्मणेतरांच्या जस्टिस पार्टीला बहुमत मिळाले व त्यांनी मंत्रीमंडळ बनविले. परंतु महाराष्ट्र तीनही निवडणुकांत ब्राह्मणेतरांचे मंत्रीमंडळ बनवू शकले नाही, कारण मद्रासप्रमाणे महाराष्ट्रात वृत्तपत्रे ब्राह्मणेतरांच्या ताब्यात नव्हती, कर्तृत्ववान पुढारी नव्हते व मुंबई राज्यात त्यावेळी गुजराथ सिंध प्रांताचा पण समावेश होता, त्यामुळे महाराष्ट्रातील ब्राह्मणेतरांचा फारसा प्रभाव पडला नाही. तरीपण १९२० ते १९२५ च्या काळात जेधे मोऱ्यांनी ब्राह्मणेतर चळवळीची (सत्यशोधक चळवळीची) आपली चुणूक दाखविली. १९२९ च्या नंतर मात्र ब्राह्मणेतर चळवळ थंडावली. त्याची कारणे– १) सत्यशोधक चळवळीचे १९१२ त पुनरुज्जीवन करणारे ब्राह्मणेतरांचे नेते छ. शाहू महाराज १९२२ त वारले. २) ब्राह्मणेतरांनी नंतर सत्यशोधक चळवळीचे उदात्त स्वरूप विसरून सत्तेच्या पाठीशी लागून व सत्यशोधक चळवळीचे सत्ताशोधक चळवळीत रूपांतर केले. ३) ब्राह्मणेतर नेत्यांची संकुचित वृत्ती:– ब्राह्मणेतर पुढाऱ्यांनी सर्व ब्राह्मणेतरांना बरोबर घेतले नाही. ब्राह्मणेतर पुढारी अस्पृश्यांना आपल्याजवळ न करता उलट अस्पृश्यता निवारणास विरोध करीत. सत्यशोधक समाजाची तत्त्वे विसरून जातीयवादी व प्रांतीयवादी दृष्टीने पाहू लागले. शहाण्णव कुळीचे मराठे इतर मराठ्यांना क्षुद्र लेखीत. याशिवाय

गुजराथी, मराठी असाही वाद ब्राह्मण ब्राह्मणेतर वादाच्या जोडीला करीत. त्यामुळे कर्ते लोक ब्राह्मणेतर चळवळींतून निघून गेले. विठ्ठलराव घाटे सरकारी नोकरीत गेले. जेध्यांनी कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला व ब्राह्मणेतर चळवळ कॉंग्रेस पक्षात विलीन झाली. ४) नवे तरुण ब्राह्मणेतर जातीय-प्रांतीय दृष्टीने न पाहता राष्ट्रीय दृष्टीने पाहू लागले. पूर्वीचे ब्राह्मणेतर (सत्यशोधकी) पुढारी १९४८ ते कॉंग्रेसमधून फुटले व त्यांनी शेतकरी कामकरी पक्ष स्थापन केला. तरी नवे तरुण पुढारी (यशवंतराव चव्हाण, बाळासाहेब देसाई इ.) राष्ट्रीय दृष्टीने प्रेरित होऊन कॉंग्रेसमध्ये कार्य करीत राहिले.

*

# काँग्रेसचा आदेश शिरोधार्य मानणे

## भूमिगतांची संघटना व त्यांची कार्यपद्धती

काँग्रेसचा आदेश शिरोधार्य मानून ब्रिटिशांची सत्ता उखडून टाकण्यासाठी सर्वत्र प्रचंड चळवळ सुरू झाली. ब्रिटिशांनी अखिल भारतीय पातळीच्या पुढाऱ्यांबरोबर तालुका पातळीवरील पुढाऱ्यांनाही अटक केली. त्यामुळे हळुहळू चळवळीची सूत्रे जनतेच्या हाती जाऊ लागली. तुरुंगाबाहेर नेत्यानी उघड चळवळ करण्याची भूमिका घेतली. ठिकठिकाणच्या सरकारी कचेऱ्यावर मोर्चे निघू लागले राष्ट्रीय निशाणे लावण्यात येऊ लागली. पाटण, वडूज, इस्लामपूर, या ठिकाणी कचेरीवर निशाणे लावण्यांत आली. तासगावला मोठा मोर्चा निघाला. इस्लामपूरच्या मोर्चात पंड्या इंजिनिअर इत्यादी मुले हातात भाले, कुऱ्हाडी घेऊन सामील झाली होती. त्यांना पिस्तुलाने पाडण्यात आले. गोळीबार झाला. कित्येक जखमी झाले. वडूजच्या मोर्चामध्ये परशुराम घाडगे हा झेंडा घेऊन आघाडीवर होता. त्यावर गोळीबार होऊन पाच, सहा जण मृत्यू पावले. सरकारकडून मोठ्या प्रमाणात माणसे मारली जाऊ लागली. त्यामुळे चळवळीचा पुर्नविचार करण्याची आवश्यकता निर्माण झाली.

येरवडा जेल फोडून बाहेर आल्यानंतर किसन वीर व पांडू मास्तर कवठ्यास आले. नंतर किसन वीर करंजखोपास व पार्ल्यास निघून गेले. दिवाळी घरी साजरी करून पांडू मास्तर पार्ले येथे गेले. श्रीयुत यशवंतराव चव्हाण यांची व किसन वीरांची सैदापूर येथे भेट झाली व कामाची दिशा ठरविण्यात आली. काही दिवसानंतर ते साताऱ्यास आले. परिस्थितीचे दडपण वाढत चालले होते. अनेक प्रकारच्या अफवा उठत होत्या. चळवळीचे स्वरुप निश्चित करून ती भूमिगत ठेवण्याचा विचार निश्चित झाला होता. याच वेळी पांडू बोराटे व बापूराव जगताप, शंकरराव जाधव, शिंदे, मुकादम वगैरे नवे जुने कार्यकर्ते लिबास जाऊन तेथून गोव्यास एकत्र आले.

पुढील कार्याची रुपरेषा ठरविण्यात आली. सातारा जिल्ह्यात वेगवेगळे गट काम करू लागले. सातारा, कोरेगांव भागात श्रीयुत किसन वीर, पंत दिवाण व गोखले हे काम करीत होते. त्यांच्या समवेत श्री. डी. जी. देशपांडे, बाबुराव घोरपडे, बाळकृष्ण घोरपडे, पांडुरंग बोराटे, बापू कचरे रामराव पाटील, तासगावकर हे कार्यकर्तेही होते. कऱ्हाड भागात श्री. यशवंतराव, कासेगावकर वैद्य, माधवराव जाधव, बाबूराव काळे, बुबा मावशोकर, भिकोबा किवळकर, वाळे भागात बरडे मास्तर, दक्षिण भागात बाबुराव चरणकर, गणपत बिअसकर, शेख काका, बाबूजी पाटणकर, निवृत्ती काका, जोशी काका, सांगली तासगाव भागात श्री. वसंतराव पाटील, खानापूर भागात नाना पाटील, नाथाजी लाड, जी. डी. लाड आणि पूर्व भागात बस्ताद इत्यादी मंडळी आपआपल्या विभागात स्वतंत्रपणे कार्य करीत होती. ही स्थिती १९४३ एप्रिल अखेर यशवंतराव पकडले जाईपर्यंत टिकून होती. ते पकडले गेल्यानंतर मात्र कार्यकर्ते आपपल्या परीने व विचाराने, काही भूमिगत राहिले. काहींनी सुतारगवंड्याच्या हाताखाली कामे घेतली. अशा तऱ्हेने विखुरलेल्या या सर्व कार्यकर्त्यांना एकत्र आणून भूमिगताची एक भक्कम संघटना निर्माण करण्याची आवश्यकता निर्माण झाली. कऱ्हाड वगैरे भागातील लोक प्रथम एकत्रित झाले व उत्तर विभागात किसन वीरांच्याकडे आले. ही सर्व मंडळी कोरेगावशेजारी एकसळ येथे श्रीयुत दादासाहेब साखळकर यांच्याकडे एकत्रित आली. यावेळी किसन वीरांनी जिल्ह्यातील भूमिगतांची संघटना उभारण्यास आपली सम्मती दिली. अशा रीतीने सर्व सातारा जिल्हा एकत्र आला. या सर्वांना एकत्र आणण्याचे काम धन्वंतरी कासेगावकर वैद्य यांनी केले.

## कार्याची रूपरेषा

भूमिगतांची संघटना उभारताना कार्याची रूपरेषा निश्चित करण्यात, आली. यात सत्ताकेंद्राचे विध्वंसन करणे, तारेचे दळणवळण बंद पाडणे, डाक, रहदारी बंगले व कचेऱ्या, पोस्टाच्या थैल्या यांचा विध्वंस करणे,

मालगाड्या लुटणे वगैरे गोष्टींचा समावेश होता. परंतु हे करीत असताना कार्यकर्त्यांनी पाळावयाची पथ्येही ठरविण्यात आली. सरकारवर हल्ला करतांना हिंसा करावयाची नाही व खाजगी मालमत्तेचे नुकसान करावयाचे नाही, याची स्पष्ट जाणीव सर्व कार्यकर्त्यांना देण्यात आली. ही चळवळ चालवीत असताना गटवार सर्वाधिकारी (डिक्टेटर) निवडण्यात आले होते. सुरवातीस श्रीयुत यशवंतराव चव्हाण, नाथाजी लाड, कासेगावकर वैद्य (धन्वंतरी) हे क्रमाने डिक्टेटर झाले. परंतु सातारा जिह्यातील सर्व भूमिगतांची संघटना झाल्यानंतर श्री. किसन वीर यांना सर्वाधिकारी निवडण्यात आले भूमिगत अवस्थेत कार्य करताना या कार्यकर्त्यांनी परस्परांना टोपण नावानी संबोधण्यास सुरुवात केली. श्री. किसन वीर हे आबासाहेब, कोसेगावकर वैद्य हे धन्वंतरी, श्री. पांडुरंग बोराटे हे तात्या आणि बापू कचरे, दिवाणजी या नावाने ओळखले जाऊ लागले. श्रीयुत किसन वीरांचे आबासाहेब नाव त्यावेळी प्रचलित झाले व आजही ते अत्यंत लोकप्रिय आहे. ठरलेल्या कार्यक्रमानुसार तारा तोडण्याचा जिल्ह्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आला. सुमारे २००० खांब तोडण्यात आले. तारा तोडण्याची एक वेगळी युक्ती या लोकांनी अमलात आणली होती. तारांवर दोरखंड टाकून त्या खाली ओढायच्या व कुऱ्हाडीने त्याचे तुकडे करावयाचे. दोरखंडानेच खांबा वाकवावयाचा व तुकडे करायचे. हे काम इतक्या तीव्र गतीने झाले की, या कार्यकर्त्यांना परकीयांचे साहाय्य असावे, त्यांच्याकडून त्याना साधनेही मिळाली असावीत, असा सरकारी रिपोर्ट झाला. याचबरोबर सरकारी बंगले जाळण्याचा कार्यक्रमही हाती घेण्यात आला. त्यानुसार नेर, खातगुण येथील डेपो व उडतारे वगैरे ठिकाणचे बंगले जाळण्यात आले. अशा प्रकारे चळवळीला उग्र स्वरूप येत होते.

क्रांतीची सुरवात अहिंसामय मार्गाने झाली. शांततामय मार्गाने नेलेल्या मोर्चावर पोलिसांनी अमानुषपणे हल्ला चढविला, त्यात स्त्रिया व लहान मुलांनाही पोलिसांच्या गोळीस बळी पडावे लागले.

अशा कृत्याना तशाच प्रकारे उत्तर द्यावयास पाहिजे याची जाणीव भूमिगताना झाली. हत्यारे मिळविणे म्हणजे जीवाशी खेळ होता. पोलीस

ठाण्यावर हल्ला करून बंदुकीने उत्तर देऊन त्यानी काही हत्यारे मिळविली पण ती किती पुरेशी पडणार? शेवटी त्यानी मुत्सद्देगिरीने हत्यारे मिळविण्याचे ठरविले. सातारा जिल्हा शूर लढवय्ये सैनिकांचा जिल्हा आहे ह्या जिल्ह्यात अनेक लोकांना बंदुकीचे परवाने आहेत, तसेच पेन्शनर सैनिकांकडेही हत्यारे मिळू शकतील ही भूमिगतांना जाणीव होती. म्हणून भूमिगतांनी अशा लोकांकडे संधान बांधले. क्रांतीचे महत्त्व पटवून दिले व या स्वातंत्र्यसंग्रामात आपणही हातभार लावावा अशी विनंती केली. त्याचा परिणाम योग्य तोच झाला. काही परवानधारकानी स्वखुषीने हत्यारे भूमिगतांच्या स्वाधीन केली व उलट सरकारकडे बहाणा केला की आमची हत्यारे भूमिगतांनी आम्हाला मारहाण करून काढून नेलेली आहेत. यामुळे आपोआपच त्यांच्यामागचा सरकारचा ससेमिरा कमी झाला पण अशा मार्गाने मिळविलेल्या बंदुकांची संख्या फार कमी होती. तसेच इंग्रजांच्या हस्तकांजवळ असलेली हत्यारे भूमिगतांना सहजासहजी मिळाली नाहीत. त्यासाठी भूमिगताना त्यांवर सक्ती करावी लागली. तसेच भूमिगतांना स्वसंरक्षणाच्या दृष्टीने अधिक हत्यारे मिळविण्यासाठी गोव्याहून काही हत्यारे आयात करण्यात आली. गोव्याहून हत्यारे आणण्याचे कार्य बॅ. जी. डी. पाटील व वसंतरावदादा यांचेवर सोपविण्यात आले होते. ते तीन वेळा गोव्यात गेले व नामदार बांदोडकरांसारख्या अनेक धनिक लोकांचे साहाय्य घेऊन त्यांनी ही कामगिरी उत्तम रीतीने पार पाडली.

## हत्यारे व दारूगोळा मिळवण्यासाठी अपार कष्ट

हत्यारे मिळविल्याने भूमिगतांचा प्रश्न सुटणार नव्हता. भूमिगतांना पोलीस तसेच दरोडेखोरांबरोबर सामना देत असताना अनेक वेळा गोळीबार करावा लागत होता. म्हणून त्याना दारूगोळ्याचा पुरवठा करणे हे अत्यंत महत्त्वाचे व अवघड काम करावे लागत होते व ही जबाबदारी आबा यांचेकडे होती. आबांनी सुरूवातीस शिरूभाऊ लिमये यांचेमार्फत मिलिटरीचा काही दारूगोळा मिळविला पण भूमिगतांचे स्वसंरक्षणासाठी दारूगोळ्याची आत्यंतिक जरूरी असल्याने दारूगोळ्याचे शोधासाठी आबांना अन्य मार्ग

शोधावे लागले, मुंबईतील एका दारूगोळा व बंदुकाविक्री करणाऱ्या दुकानातील विक्रेत्याच्या नोकराकडे त्यानी संधान बांधिले. ' चळवळीसाठी तू मदत करीत आहेस म्हणजे स्वातंत्र्यासाठी तू झटत आहेस, तुझे श्रम कारणी लागत आहेत ' असे विचार त्याचे मनावर बिंबविले. कर्मधर्मसंयोगाने तो सातारा जिल्ह्यातील बिळाशी भागातील रहिवाशी निघाला. त्याने केलेली मदत बहुमोलाची ठरली. त्यावेळी आबांचा मुक्काम मुंबईत होता. अगोदर ठरलेल्या दिवशी संध्याकाळी बरोबर सहा वाजता प्रिन्सेस स्ट्रीटच्या नाक्यावर ते या बहादुराची वाट पहात असत. आणि हा मनुष्यसुद्धा कापडाच्या साध्या पिशवीत छोटी बॅग घालून त्यात काडतुसे घालून आणीत असे अशा प्रकारे त्या विक्रेत्याच्या नोकराने खूप मोठ्या प्रमाणात काडतुसांचा पुरवठा केला.

पण एकाच प्रकारच्या बंदुका भूमिगतांचे जवळ नव्हत्या, त्यामुळे त्या बंदुकांना लागणारी सर्व प्रकारची काडतुसे मुंबईत मिळाली नाहीत. १२ बोअरच्या राइफलसना लागणारी काडतुसे मुंबईत बरीच मिळाली. त्या काडतुसांच्या शोधात असताना आबांना त्यांचे मित्र हरीभाऊ धुमाळ भेटले व त्यांचेबरोबर सहज गप्पागोष्टी करीत असताना त्यांच्या एका नगर जिल्ह्यातील पाहुण्यांची श्री. धुमाळ यांना आठवण झाली. ते पाहुणे लष्करात कर्नलच्या हुद्यावर काम करणारे श्री. अमृतराव मोहिते होत. त्यांच्या सर्व कुटुंबियांशी आबांची चांगली ओळख होती. आबांचे डोक्यात विचारचक्र सुरू झाले. कोणतीही एखादी जबाबदारी स्वीकारल्यानंतर कितीही संकटे आली तरी मागे हटायचे नाही व चिकाटीने प्रयत्न करीत रहाण्याचा हा आबांचा बाणाच होता. या स्वभावानुसार आबा नगर जिल्ह्यामध्ये गेले. कर्नलसाहेब नोकरीवर होते व घरी फक्त त्यांची पत्नी होती. आबांना पाहिल्यानंतर त्या साध्वीने आपल्या खानदानी घराण्याला शोभेल असे उचित स्वागत केले व काडतुसे देऊन त्यांची बोळवण केली. अनपेक्षित यश मिळाल्याने आबा खुशीत होते व याच आनंदात ते रेल्वेतून भायखळा स्टेशनवर उतरले. पुढे निराळेच संकट वाढून ठेवलेले त्यांना दिसले. हातात काडतुसानी भरलेली पिशवी घेऊन ते प्लॅटफार्मवर उतरतात

तोच एका पोलिसाने त्यांना हटकले व आबांना म्हणाला 'थैली खोलो' 'थैली मे क्या है?' हे ऐकताच आबांच्यापुढे प्रश्नचिन्ह उभे राहिले पोलीसांच्या गोळचा छातीवर झेलणाऱ्या आबांचे छातीत या बोलण्याने धस्स झाले. पण का? त्यांच्या घाबरण्याचे कारण निराळे होते. त्यांच्या नजरेसमोर कर्नल मोहित्यांची पत्नी उभी राहिली. ज्या साध्वी स्त्रीने देशभक्तीने प्रेरित होऊन आबाना ही बहुमोलाची मदत केली होती ती करताना तिने आपल्या नवऱ्याच्या नोकरीचा विचार केला नव्हता. अशा खानदानी घराण्यातील देवतेस पोलिसांचा पाहुणचार मिळणार की काय अशी त्यांना धास्ती पडली. आबाना स्वतःची चिंता नव्हती देशासाठी आत्म-बलिदान करावयास निघालेल्या भूमिगतांचे ते नेते होते. मग त्यांना पोलिसांची भीती काय वाटणार? पण अशा प्रसंगीही आबांनी न डगमगता पोलीसाला दिली हुलकावणी. आबा पोलिसाला म्हणाले, 'मला वाटलेच, पण तुमचा दोष नाही, तुम्ही चोर सोडून संन्याशालाच फाशी देणार, गुंड दररोज वाटेल तेवढा माल नेत आहेत व आणत आहेत, त्यांना मात्र हा त्रास नाही. त्रास मात्र आमच्यासारख्या लोकांना, ही पहा पिशवी, असे म्हणून बाबानी ती पिशवी त्या पोलिसांपुढे धरली, आणि पहा काय पाहावयाचे ते पहा. असे म्हणून पिशवीतील काडतुसांच्यावर ठेवलेली मफलर व दाढीच्या सामानाची छोटी बॉक्स पोलिसांना दाखविली. हे सामान पाहून, चला जावा म्हणून त्याने तोंड फिरवले व आबांना जाण्याची परवानगी दिली.

## गुंड दरोडेखोरांनी घेतलेला फायदा

सातारा जिल्ह्यात भूमिगतांचे कार्य संघटितपणे जोमाने सुरू झाले. एकाच वेळी पुणे बंगलोर रस्त्यावरील पुष्कळ ठिकाणी तारांचे दळणवळण तोडण्यात आले, रहदारी बंगल्यांना आगी लावण्यात आल्या, उडतरे जवळील छोटा पूल उध्वस्त करण्यात आला. पळशी, ताकारी या स्टेशनाजवळ मालगाड्या उलटवून टाकण्यात आल्या. ही भूमिगतांची कार्ये पाहून साहजिकच सरकारी अधिकाऱ्यांना व पोलिसांना भूमिगतांची दहशत वाटू

लागली. पण जनतेत मात्र त्याची निराळी प्रतिक्रिया उमटली. लोकांच्या मनात भूमिगताविषयी आदराची भावना निर्माण झाली. भूमिगतांना सर्व प्रकारचे सहाकार्य जनतेतून मिळू लागले. ते जनतेचे पुढारी बनले, पण याचा फायदा सातान्यातील गुंडांनी व दरोडेखोरांनी घेण्यास सुरूवात केली. भूमिगतांच्या नावावर चोऱ्या व दरोडे पडू लागले. खाजगी भांडणामुळे निर्माण झालेल्या वैऱ्याचा सूडही हे गुंड उगवू लागले. कामेरी गावच्या आसपासचे भागात भिन्न ठिकाणच्या गुन्हेगारांची एक जबरदस्त टोळी वावरत होती. त्या टोळीचे नेतृत्व सखाराम बारेबट्टे या सुप्रसिद्ध दरोडेखोराकडे होते, त्या टोळीची सत्ता ब्रिटिशापेक्षाही जास्त मानली जात होती. त्या भागतील ते सुप्रीम कोर्ट होते, त्या टोळीने दिलेल्या निकालाविरुद्ध वर्तन केल्यास त्या गुन्हेगारास हालहाल करून ठार मारण्याशिवाय दुसरे शासन नव्हते. सात-सात आठ-आठ खून केलेले खुनी दरोडेखोर व अशा गुन्ह्याबाबत ज्याना ब्रिटिशांची वॉरंटस् होती, असेच लोक या टोळीत सामील होते. भूमिगत चळवळीमुळे पोलिसांचे सर्व लक्ष भूमिगतांवर केंद्रित झाले होते. वरील टोळीने पोलिसांकडे संधान बांधले होते, म्हणून पोलीस त्यांच्या कृष्णकृत्यांकडे जाणून-बुजून दुर्लक्ष करीत होते. त्यामुळे टोळीवाल्यांचे अनायासे फावले होते. त्यांचा त्या भागात नंगानाच अनेक वर्षे चालू होता. लोकांचे जीवित आणि वित्त दोन्हीही धोक्यात होती जनतेच्या मनात भूमिगतांविषयी कटुता निर्माण करण्यासाठी भूमिगतांचे नावाखाली त्यांनी जनतेचा छळ करण्यास सुरवात केली हे पाहून आबानी त्या भागातील आपले सहकारी श्री. दर्डे मास्तर, बाबूजी पाटणकर, पांडू मास्तर, कासेगावकर वैद्य, शेखकाका यांच्या मदतीने जनतेची जी दिशाभूल होत आहे, ती दूर करण्याचा व लोकाना दिलासा देण्याचा प्रयत्न केला. भूमिगत नेते आपल्या भागात येऊन अशा प्रकारची ढवळाढवळ करीत आहेत या गोष्टी त्या टोळीवाल्यापैकी एक नेते सखाराम बारबट्टे यांना पटल्या नाहीत. उलट सखारामने आमची या भागात दहशत आहे म्हणूनच तुम्ही सुरक्षित आहात अशी आबांच्याजवळ बढाई मारली. तेव्हा आबांनी सखारामास भूमिगतांच्या चळवळीचे व ध्येयाचे स्पष्टीकरण केले, आणि आबा

म्हणाले, सखाराम तुमचे क्षत्र वेगळे आहे व आमचे क्षेत्र वेगळे आहे. भूमिगतांची चळवळ ही एक सातारा जिल्ह्यातील एका तालुक्यात किंवा तालुक्याच्या एका भागात नाही तर तिचे क्षेत्र कन्या-कुमारीपासून हिमालयापर्यंत आहे. तेव्हा या चळवळीस समाजकंटक, खूनी, दरोडेखोर यानी आव्हान देणे म्हणजे मुंगीने मेरू पर्वतास गिळण्यासारखे आहे. तुम्हा गुन्हेगारांची हिंमत असेल तर उद्या इसलामपूर कचेरीवर आपण जाऊ. तिथे आपणाला आपल्या सामर्थ्याचे प्रदर्शन दाखविता येईल असे आबानी सखारामास खडसावून सांगितले. गुन्हेगार टोळ्यांनी भूमिगतां-बरोबर उघडउघड सामना देऊन त्यांचा नायनाट करण्याचे ठरविले. गुप्त पोलीसांना दरोडेखोर व भूमिगत यांच्यात फार मोठा संघर्ष वाढला आहे याचा सुगावा लागला व पोलीस खात्याने त्यादृष्टीने पावले टाकण्यास सुरुवात केली. त्यावेळी साताराचे डी. एस्. पी. गिलबर्ट हे होते. त्यांची टोळीवाल्यांशी बैठक झाली; त्यात तुमच्यावरील वॉरंटस् रद्द करतो, गुन्हे काढून घेतो, भूमिगतांचा नायनाट करण्यासाटी आम्ही आमचे पोलीसही तुम्हास मदतीस देतो असे आश्वासन दिले. ब्रिटिशांसारख्या लोकशाहीवर आत्यंतिक श्रद्धा असलेल्या राजकर्त्यांनी स्वातंत्र्यभावनेने प्रेरित झालेल्या राष्ट्रप्रेमी भूमीगतांचा नायनाट करण्यासाठी अशा कूटनीतीचा अवलंब करावा हे कुटिल राजनीतीला सोडून नव्हते. अगोदरच गुन्हेगार व त्यात पोलीसांचे साहाय्य म्हणजे माकडाच्या हाती कोलीतच. गुन्हेगारांचे उत्सा-हाला पारावार राहिला नाही. त्यानी भूमिगतांचा नायनाट करण्याचा चंग बांधला. यामुळे परकीय सरकार व समाजद्रोही गुन्हेगारांशी मुकाबला करणे भूमिगतांना क्रमप्राप्त झाले होते. कामेरी भागातील भूमिगत कार्यकर्ते सर्वश्री बर्डे मास्तर, बाबूजी पाटणकर, कासेगावकर वैद्य, शेखकाका वगैरे मंडळींनी या दरोडेखोरांचा पक्का बंदोबस्त झाल्याखेरीज आपण स्वस्थ बसायचे नाही असा निश्चय केला. श्री. बर्डे मास्तर यांनी तर या दरोडे-खोरांचा नायनाट झाल्याखेरीज आपण स्वस्थ बसणार नाही अशी भीष्म प्रतिज्ञा केली.

परंतु या गुन्हेगारांच्या टोळीशी झुंज देणे, त्यांच्याशी समोरासमोर

सामना देणे ही गोष्ट काही सोपी नव्हती. अर्थात 'स्वातंत्र्यरक्षणा झुंज देण्या' सज्ज झालेल्या त्या क्रांतिवीरांना या गोष्टीचे विशेष भय वाटणे शक्यच नव्हते. परंतु या गुन्हेगारांच्या टोळीचे नेतृत्व काही साध्यासुध्या मंडळींकडे नव्हते. त्या क्षेत्रात अट्टल दादा असणाऱ्या आणि सात-सात, आठ-आठ खून पाडलेल्या प्रसिद्ध मारुती शेणेकराशी या भूमिगतांशी गाठ पडणार होती. अशा अनेक खुनी गुन्हेगारांच्या टोळ्या वावरत होत्या. क्रूर आणि सराईत टोळ्यांशी तोंड द्यावयाचे होते. त्यातच ब्रिटिश सरकारचा भूमिगत क्रांतिकारकांविषयी राग इतका पराकोटीला पोचला होता की त्यापायी लोकशाहीचे आणि कायदेशीरपणाचे सर्व संकेत त्यांनी धाब्यावर बसविले होते. त्यानी केवळ गुन्हेगारांना उत्तेजन दिले असे नाही तर सशस्त्र पोलीस त्यांच्या मदतीला दिले आणि ते गुन्हेगारच आहेत अशी भूमिगतांची फसगत व्हावी म्हणून त्यावेळचे एक सी. आय. डी. अधिकारी यांनी त्या पोलिसांना मार्गदर्शन केले. या पोलिसांच्या मदतीने आपण क्रांतिकारकांना सहज ठार मारू असा विश्वास मारुती शेणेकर व त्यांचे सहकारी यांना वाटत होता.

## वाटेगावचा संग्राम

क्रांतिकारकांची संख्या गुन्हेगारांच्या टोळीच्या मानाने फारच कमी होती. परंतु युक्ति आणि जनतेचे उत्स्फूर्त सहकार्य या गोष्टीचे फार मोठें पाठबळ त्याना लाभलेले होते. त्यामुळेच डावपेचांचा वापर करून त्यांनी दरोडेखोरांचा बंदोबस्त करण्याचे ठरविले. वाटेगावच्या रानात या गुन्हेगाराची आणि भूमिगत कार्यकर्त्यांची गाठ पडली. भूमिगतांनी गनिमी तंत्रे अवलंबिले.

कुरंदवाड संस्थानची हद्द जवळच होती. भूमिगत या हद्दीत शिरले. कोठे गुन्हेगारांना उष्टया पत्रावळी टाकून, तर कोठे खरकटे कागद टाकून आम्ही इथे-तिथे सर्वत्र आहोत अशी हुलकावणी देत आम्ही वाटेगाव-कासेगावच्या हद्दीशी आलो. संस्थांनी पोलिसांचा भूमिगतांचा पूर्ण पाठिंबा होता. सशस्त्र पोलीस भूमिगत क्रांतिकारकांच्या मदतीस धावून आले, तसेच वरील

दोन्ही गावातील ग्रामस्थ या लढ्यात उत्स्फूर्त सामील झाले. एका बाजूला अट्टल गुन्हेगार आणि ज्यांनी त्याचा बंदोबस्त करायला हवा असे सरकारी पोलीस आणि दुसऱ्या बाजूला स्वातंत्र्यवीर, त्याना साहाय्य देणारे संस्थानी पोलीस आणि आगामी भारतीय स्वातंत्र्याचे स्वागत करण्यास अधीर झालेली सुसज्ज भारतीय जनता यांचा तो सरळ सामना होता. समोरासमोर बंदुकांच्या फैरींनी तोंड फुटले. क्रांतिकारकांपैकी शेखकाका, बाबूजी पाटणकर वगैरेंची नेमबाजी अचूक होती. लवकरच त्यांनी गुन्हेगारांची व पोलिसांची दाणादाण उडविली. गुन्हेगारास मदत करणारे पोलीस वेष बदलून मदतीस आले होते. ते तसेच पोलीस स्टेशनकडे पळत सुटले त्यावेळी त्यांचे गणवेष पडले ते भूमिगतांनी ताब्यात घेऊन संस्थानी पोलिसांचे ताब्यात दिले व ब्रिटिशांच्या कूटनीतीचे प्रदर्शन जनतेस घडविले.

दरोडेखोरांचा नेता मारुती शेणेकर या समोरासमोर झालेल्या युद्धातील रणांगणातून पळून गेला. त्याचा दुसरा एक विश्वासू सहकारी भूमिगत कार्यकर्त्यांच्या हाती लागला. मारुती सापडावा म्हणून त्या भूमिगत कार्यकर्त्यांनी त्या साथीदाराला बेदम मारहाण केली. पण तोही इतका पक्का की, त्याना बधता बधेना. शेवटी बर्डे मास्तर, बाबुजी पाटणकर, शेखकाका, कासेगावकर वैद्य वगैरेंनी लाकडाची चित्ता रचून त्यावर त्याला त्याचे हातपाय बांधून ठेवला आणि जर तू शेणेकराचा पत्ता दिला नाहीस तर या चित्तेत तुला जाळून टाकू अशी धमकी दिली. क्रांतीवीरांचे हे उग्र स्वरूप पाहून तो साथीदार शुद्धीवर आला व हतबल होऊन त्याने मारुती शेणेकर आबा माळ्याचे वस्तीवर लपून बसला आहे, असा पत्ता दिला.

मारुती शेणेकर आबा माळ्याच्या वस्तीवरील एका बुचाडात लपून बसला होता. भूमिगतांनी आबा माळ्याला खूप छेडले परंतु त्यानेही सहजासहजी दाद दिली नाही. क्रांतिकारकांना तर मारुती शेणेकर हवाच होता. कारण तो सशस्त्र होता. आणि तशा परिस्थितीत त्याला निसटू देणे धोक्याचे होते. शेवटी त्यांनी आबा माळ्याच्या पिंडरीत गोळी घातली. तेव्हा वेदना असह्य होऊन कळवळून त्याने बुचाडाकडे बोट दाखविले. बुचाडात मारुती शेणेकर सशस्त्र लपला असल्याने धोक्याचेच होते. म्हणून

त्या कार्यकर्त्यानी ते बुचाडच मागील भागी पेटवून दिले. तेव्हा तो बंदूक सावरून बुचाडाबाहेर आला परंतु त्याला काहीही हालचाल करण्याची संधी न देता कार्यकर्त्यांनी गोळी झाडून ठार केले.

या टोळीचा बीमोड झाल्यामुळे क्रांतिकारकांबद्दल त्या भागातील जनतेचा आदर अधिकच दुणावला. अशा प्रकारच्या अनेक जनताभिमुख कार्यामुळे भूमिगत कार्यकर्त्यांविषयी लोकांच्या मनात फार मोठा आदर निर्माण झाला.

ज्या टोळीवाल्यांच्या दहशतीमुळे सर्वसामान्य जनतेला आपले नित्याचे व्यवहार करणे मुष्किलीचे होऊन बसले होते, अशा खुनी टोळीवाल्यांच्या तावडीतून जनतेची सुटका केली. त्याना मदत करणाऱ्या पोलीसांचा निःपात करून सरकारच्या कपटी आणि खुनशी धोरणाचा बुरखा फाडला. ही क्रांतीकारकानी बजावलेली कामगिरी मोलाची आणि बहादुरीची होती. या वाटेगावच्या सामन्याच्या कामगिरीची रूपरेषा आखण्याचे कार्य त्यावेळचे भूमिगताचे डिक्टेटर आबा यांनीच केले होते.

## भूमिगतांचे गुप्तहेरखाते व न्यायदान मंडळ

टोळीवाल्यास मदत करूनही भूमिगतांचा नायनाट करता आला नाही, म्हणून सरकारने भूमिगतांना पकडून देण्यासाठी मोठमोठी बक्षिसे जाहीर केली. बक्षीसाच्या लालसेने सरकारधार्जिण्या गुंडानी भूमिगतांच्या हालचालीच्या बातम्या पोलीसांना द्यावयास सुरूवात केली. त्यामुळे काही भूमिगत कार्यकर्ते पकडले गेले, व इतराना कार्य करणे अवघड झाले. यासाठी भूमिगतांनी आपले गुप्तहेर खाते निर्माण केले व त्याच्या मार्फत पोलीसांना बातमी देणाऱ्या गुंडाचा तपास केला व त्यांना भूमिगतांचे न्यायदान मंडळापुढे हजर करण्यात आले, न्यायदान मंडळ आरोपीच्या गुन्ह्याची चौकशी करून ज्या गुंडाशी बक्षिसाच्या लालसेने गुन्हा केलेला असेल त्यांचे कडून बक्षिसाच्या दुप्पट रक्कम दंड म्हणून वसूल करीत असे व ही रक्कम त्याच गावातील सार्वजनिक कार्यासाठी ताबडतोब

देणगी म्हणून देत असे. काही अक्षम्य गुन्ह्याबद्दल पत्री मारण्यासारख्या शारीरिक शिक्षाही केल्या जात असत.

न्यायदान मंडळाची कार्यपद्धती वाखाणण्यासारखी होती. भूमिगताच्या कामात एकसूत्रीपणा येण्याचे दृष्टीने काही नियम तयार करण्यांत आले होते त्यावेळी सातारा व सांगली हे दोन्ही जिल्हे एकच होते. ह्या जिल्ह्याचे तीन गट पाडले होते. ह्या तिन्ही गटावर सर्वाधिकारी (डिक्टेटर) असे प्रत्येक गटावर गट नायक नेमलेले असून त्या गटनायकाचे हाताखाली प्रत्येकी तीन सुपरवायझर नेमण्यात आले होते. विधायक कामाकडे जास्तीत जास्त लक्ष देणे हा ह्या यंत्रणेचा मुख्य हेतु होता, परंतु त्यांना विधायक कामाबरोबर गुंडापासून संरक्षण करण्याचेही कार्य करावे लागत होते ग्रामराज्याची कल्पना जास्तीत जास्त मूर्त स्वरूपात आणून न्यायमंडळामार्फत लोकांची गान्हाणी दूर करण्याकडे त्यांचा विशेष कटाक्ष होता. न्यायदान मंडळापुढे ज्या माणसाविषयी तक्रार केली जात असे त्याला न्यायदान मंडळ लेखी नोटीस देऊन त्याच्या वागणुकीबद्दल समज देत असे. अशी समज देऊन जर तक्रार केलेल्या इसमाचे वागणुकीत काही फरक झाला नसेल तर गटनायक स्वत: त्या इसमास भेटून त्याच्याशी चर्चा करून त्याचे मन वळविण्याचा प्रयत्न करीत असे व नीट वागण्यास सांगण्याचा प्रयत्न करीत असे. परंतु यानंतरही जर त्या इसमाचे वर्तणुकीत फरक झाला नाही तर त्या इसमाचे बाबत डिक्टेटरला गटनायक रिपोर्ट करून सविस्तर आरोपाचे वर्णन करून आपले मत कळवीत असे. गटनायकाचे रिपोर्टाप्रमाणे सदर इसमाची डिक्टेटरने नेमलेल्या कमेटीमार्फत त्याच्या गुन्ह्याची चौकशी होत असे व त्यानंतर गटनायकास शिक्षा करण्याची परवानगी डिक्टेटर देत असे. घाईघाईने हेतुपुरस्सर एखाद्यावर अन्याय होता कामा नये हा त्या पाठीमागील हेतु होता. डिक्टेटरच्या परवानगीशिवाय गटनायकास शिक्षा करण्याचा अधिकार नव्हता. काही वेळेस डिक्टेटरची परवानगी लवकर न आल्याने आरोपी भूमिगताचे हातातून गेल्याचीही उदाहरणे आहेत. कराडचे शंकर सिताराम पाटील हे याचे एक उदाहरण आहे.

शंकर सिताराम पाटील हे तांबवे गावचे शिक्षक. ब्रिटिश सरकारच्या बाजूचें होते. भूमिगत चळवळीला त्यांचा पूर्ण विरोध होता. भूमिगतांच्या

सर्व हालचालींची बातमी ते पोलिसांना पुरवीत असत. त्यामुळे त्यांना पोलिसांचे संरक्षणही मिळाले होते. भूमिगतांनी त्यावर पाळत ठेवली व एके दिवशी हे मास्तर कराडचे पोलीस संरक्षणात संध्याकाळचे सुमारास जेवावयास जात असताना पोलीस सहज थोडे पुढे गेले व शंकर सिताराम कराडमधील रहदारीचे रस्त्यावर थोडे मागे राहिलेले पाहून श्री. एम्. एन्. जाधव यांचे सहकारी ह्यांनी चटकन पिस्तूल काढून शंकर सिताराम याचे छातीवर रोखले व त्यांना तसेच पाठीमागे नेऊन कराडचे बाहेर पश्चिम बाजूने एका खेड्यात नेऊन ठेवले. वास्तविक शंकर सिताराम हे भूमिगतांच्या न्यायदान मंडळाच्या दृष्टीने गंभीर शिक्षेस पात्र होते.

परंतु डिक्टेटरची परवानगी घेतल्याशिवाय शिक्षा करता येत नव्हती. त्यावेळी डिक्टेटर आबा होते, म्हणून आबांची परवानगी मिळविण्यासाठी दोन मंडळींना पाठविण्यात आले. परंतु आबा त्यावेळी वडगाव (कोल्हापूर) येथे होते. त्यांची व ह्या दोन मंडळींची भेट सहा दिवसानंतर झाली. आबानी शंकर सिताराम वरील आरोपपत्र भूमिगतांचे कार्यकारी मंडळा. पुढे ठेवले व कार्यकारी मंडळात त्याबाबत चर्चा होऊन शंकर सितारामयास शिक्षा देण्यात यावी असा निर्णय देण्यात आला. परंतु दरम्यानच्या काळात पोलीसांनी शंकर सितारामला शोधून काढण्यासाठी सर्व शक्ती पणास लावली. एम्. एन्. जाधव, बाबूराव काळे वगैरे तरुण कार्यकर्त्यांवर पोलीसांनी फार मोठे दडपण आणले. त्यामुळे शंकर सिताराम यांना सोडून द्यावे लागले. अशाप्रकारे भूमिगतांच्या दृष्टीने एक फार मोठा गुन्हेगार हाती आला असतानाही डिक्टेटरची परवानगी वेळेवर न मिळाल्याने त्या गुन्हेगारास शिक्षा न करता सोडून द्यावे लागले.

## भूमिगतांवरील वृथा आरोप

भूमिगत दरोडेखोर होते. पैशासाठी वाटेल त्या माणसांना पत्र्या मारीत होते. अशा प्रकारचा आरोप भूमिगत प्रकट झाल्यानंतर काही विद्वान महाशयांनी भूमिगतांविषयी पूर्वग्रहदूषित दृष्टी ठेवून केलेला आहे. तसेच

त्यांच्यात एकसूत्रीपणा नव्हता, संघटना बळकट नव्हती असेही काही टीकाकार लिहितात. वरील घटनेची सत्यासत्यता पडताळून पहावी

प्रतिसरकारची स्थापना झाल्यानंतर दिवसेंदिवस भूमिगत चळवळीने उग्र स्वरूप धारण केले. सरकारला ह्या चळवळीचा बीमोड करण्यासाठी लष्कराला पाचारण करावे लागले. मुंबई राज्यातील पोलीस सातारा जिल्ह्यात आणविले गेले आणि पोलीस अत्याचाराला उधाण आले. भूमिगतांच्या चळवळीची केंद्रे समजली जाणारी गावेच्या गावे पोलीसांनी झोडपून काढली. ह्याची कवठे गावासही झळ लागली. गावातील १०० ते १५० लोकांना अटक करून वाईस नेण्यात आले. त्यामध्ये ७–८ स्त्रियाही होत्या. आबांचे पत्नीलाही वाईचे कस्टडीत विनाचौकशी डांबण्यात आले. त्यावेळी कच्ची कैद म्हणजे अक्षरशः नरक होता. संशयावरून अटक केलेल्या इसमांना भूमिगतांसंबंधी माहिती द्यावी म्हणून रात्रीच्यावेळी उघडे नागडे करीत असत. त्याला ओणवे करून दोन पोलीस दोन हात व दोन पोलीस दोन पाय धरून त्याचे ढुंगणावर मिठाचे पाणी टाकून चामड्याचे पट्ट्याने एकसारखे मारीत असत. अशा मारहाणीच्यावेळी तो इसम मोठमोठ्याने ओरडत असे व शेवटी बेशुद्ध होत असे. तरीसुद्धा त्याची मारहाण थांबवली जात नसे. शुद्धीवर आल्यानंतर परत त्याच पद्धतीने मारहाणीस सुरुवात होत असे. अशा प्रकारे मारल्यामुळे त्या इसमास ६-६ महिने पाठीवर झोपताही येत नसे. बसता येत नसे. रांगणाऱ्या मुलाप्रमाणे ओणवे होऊन सर्व व्यवहार करावे लागत असत. काही काही तर जन्माचे अधू झाल्याचे आपणास पहावयास मिळतात. अशा प्रकारे संशयित लोकांच्या मार्फत वरील प्रकारे तपास करून जर गुन्हेगाराचा शोध लागला नाही. भूमिगत सापडले नाहीत तर सामुदायिक दंडाचे शस्त्र सरकार उपसत असे व तो दंड सक्तीने वसूल केला जात असे. ह्या पोलीसी अत्याचारामुळे जनता अधिकच त्रस्त झाली. म्हणून भूमिगतांचे नेते आबा यांनी कामेरीजवळील एका उसाचे शेतात सर्व भूमिगतांची बैठक बोलावली. त्या बैठकीचे वेळी मा. यशवंतराव चव्हाण हे फलटण येथे होते. त्यांनी शांताराम इनामदार ह्या भूमिगत कार्यकर्त्याबरोबर सर्व भूमिगताना उद्देशून एक संदेश

पाठविला. त्या संदेशाचा आशय थोडक्यात असा की, ' हल्ली सातारा जिल्ह्यात पोलिसांचे जाळे पसरले आहे. उंब्रज येथे मिलिटरीचा तळ आहेच व लष्कर बोलावले जात आहे. त्यामुळे ज्यांच्यासाठी आपण त्याग करीत आहोत ती जनताच जर आपल्या कार्यामुळे त्रस्त झाली तर आपल्या कार्याला काही अर्थ उरणार नाही. म्हणून आपण सर्वांनी हजर व्हावे हे योग्य.' हा खलिता त्या बैठकीत मांडण्यात आला. त्यावर प्रदीर्घ चर्चा करून त्यातील अडचणींचा विचार केला व भूमिगतांचे अंगीकृत कार्य नेटाने चालवावे असे ठरले. ताबवे (ता. कऱ्हाड) गावातील काही कार्यकर्त्यांच्या उपद्व्यापामुळे हा प्रश्न निर्माण झाला होता म्हणून वरील संदेश आला होता.

कामेरीच्या बैठकीत आबांच्या नेतृत्वाखाली भूमिगतांनी सविस्तर कार्यक्रमाची आखणी केली तो कार्यक्रम असा– (१) जनतेची गाऱ्हाणी ऐकून त्याची नोंद करणे व त्यांचा निकाल न्यायमंडळामार्फत देणे. (२) स्थावर मिळकतीचा निकाल मात्र या न्यायमंडळाचे अधिकारकक्षेखाली येत नव्हता. (३) गावातील दोन पार्टी मिटविणे. (४) नवरा नांदवीत नाही किंवा बायको नांदत नाही, अशा प्रकारचे भांडण तंटे मिटविण्याचे काम करणे. (५) न्यायमंडळामार्फत वसूल केलेला पैसा (दंड) सार्वजनिक कामासाठी त्या त्या गावातील लोकांना परत करणे. (६) लग्नासारख्या बाबतीत शेतकरी अनाठायी फार पैसे खर्च करतात व ते कर्ज-बाजारी होतात. म्हणून अत्यंत कमी खर्चामध्ये सामुदायिक लग्नविधी करण्याची प्रथा घालून लोकांना काटकसरीची संवय लावण्याचा प्रयत्न करणे. (७) लोकात स्वराज्याची भावना जागृत करण्यासाठी स्वयंसेवक दल व कॉंग्रेस सेवादले यांची स्थापना करणे. (८) तसेच स्वतंत्र भारत या नावाने एक पत्रक काढून लोकात क्रांतिपूरक अशा प्रकारचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करणे. सदर पत्रकाच्या ५ ते १० प्रती प्रत्येक गटाकडे पाठविल्या जात असत. ह्या पत्रकाची कचेरी पाचंद्री (पाचगणी) पेटा शिराळा या गावाजवळ होती. या पत्रकाच्या संपादनाचे कार्य विठ्ठलपंत कुलकर्णी यांच्याकडे होते.

## भूमिगतांची उज्ज्वल प्रतिमा

वरील जनताभिमुख कार्यक्रमामुळेच भूमिगत चळवळ ही जनतेची चळवळ झाली असे नाही. तर वरील कार्यक्रमाबरोबरच भूमिगतांचे चारित्र्य उज्ज्वल ठेवले ह्याला ह्या चळवळीच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे स्थान होते. भूमिगतांची निवासस्थाने म्हणजे खेडयातील छोटी छोटी घरे व त्या घरातही त्यांना स्त्रियांच्या समवेत पुष्कळ वेळा पुरुष मंडळी कोणीही जवळ नसतानाही रहावे लागत होते. त्यावेळी चारित्र्याला फार महत्त्व होते. चारित्र्याचा जराही संशय कोणाला आला असता तर त्यानी ताबडतोब भूमिगताना सरकारी पाहुणचार खाण्यास पाठवून दिले असते. पण जनतेत पुरुष मंडळीत त्याचविषयी विश्वास होता. तर स्त्रियांच्या मनात भूमिगताविषयी आदराची भावना होती. म्हणूनच पोलीसांचा छापा आला असताना स्त्रिया भूमिगताना आपला भाऊ दीर वेळप्रसंगी नवराही म्हणण्यास कमी करत नसत. व आज अभिमानाने सांगण्यास हरकत नाही की, या संपूर्ण भूमिगत चळवळीस एकाही कार्यकर्त्याने आपल्या चारित्र्यास कलंक लागेल असे वर्तन अजिबात केलेले नाही. तसेच त्यांची रहाणी अत्यंत साधी होती. आपल्या चैनीसाठी त्यानी जनतेच्या खाजगी मालमत्तेचे अजिबात अपहरण केले नाही. जिल्ह्यात जेवणासाठी त्याना पैसे खर्च करावा लागत नव्हता. मिळेल तेव्हा आणि मिळेल त्या प्रकारची भाकरी हातावर घेऊन खाणे, त्यात आवडीनिवडीचा प्रश्नच नव्हता. त्यांचा पोशाखही सर्वसाधारण शेतकऱ्यासारखाच होता व तोही ते शेतकऱ्याकडूनच मिळवीत असत. कपडे मळके व शेतकरी पद्धतीचे घातलेले असत. खाण्यापिण्यासाठी यांनी कधीही जनतेला छळले नाही. ज्या ठिकाणी ओळख नाही अशा ठिकाणी दूध भाजीपाला पैसे देऊन विकत घेत असत. पुष्कळ वेळा सार्वजनिक जेवणावळीत बसून ते जेवण घेत असत. एकदा भूमिगतांचा मुक्काम वाईस असताना आपल्या जेवणाचा इतरांना त्रास होऊ नये म्हणून सर्व भूमिगत कृष्णाबाई उत्सवाच्या निमित्त होणाऱ्या घाटावरील जेवणावळीस हजर होते व विशेष म्हणजे महाराज नावाचा एक चांभार भूमिगतही

ब्राह्मणाशेजारी बसून दोन दिवस जेवण घेत होता. साधी काटकसरीची रहाणी यावर भूमिगताचा फार कटाक्ष होता. एकदा आबा कोल्हापूरास असताना त्यांनी ३।। रुपयांचा सेफ्टी रेझरचा सेट खरेदी केला. पुढे जमा-खर्च सादर करताना ह्यावर कडक टीका झाली. ह्यात लहानसहान बाबींकडे बारकाईने पाहण्याचे प्रत्यंतर दिसून आले.

*

# भूमिगतांचे दिव्य

## भूमिगतांना जनतेचे अमोल सहकार्य

भूमिगत असताना कित्येक वेळा असे प्रसंग येत असत की केवळ कमालीची थंड वृत्ती, धीमेपणा आणि प्रसंगावधान दाखविल्यामुळेच अशा प्रसंगातून सुटका करून घेता येत असे. पुष्कळ वेळा पोलिसांनी पकडण्याचा डाव रचावा आणि त्यातून सहजतेने सुटका करून घ्यावी. असे प्रसंग भूमिगतांचे जीवन कंठित असता आबासाहेबांच्या ( किसनवीरांच्या ) जीवनात बरेच वेळा आले.

आबा वाई येथे नेहमी यशवंत प्रेसचे मालक श्री. सोहनी यांच्याकडे उतरत. परंतु ते येथे उतरतात ही बातमी षट्कर्णी झाल्याने त्यांनी आपल्या मुक्कामाची जागा बदलली. त्यावेळी भूमिगतांना पकडण्यासाठी सरकारने काही रोख बक्षिसेही जाहीर केली होती. त्यामुळे आबांना पकडण्यासाठी पोलीस खाते अगदी अधीर झाले होते. एकदा श्री. बाबा लेले यांच्या घरी आबांनी आपला मुक्काम केला असता तेथून ते श्री. वैशंपायन वकिलांना भेटण्यासाठी गेले. जातांना त्यांनी आपल्या जवळचा उत्तम बनावटीचा ५५ बोअरचा रिव्हॉल्व्हर बैठकीवरच ठेवला होता. परत आल्यावर पाहतात तो, तो रिव्हॉल्व्हर तेथून नाहीसा झालेला. त्यामुळे आबा अस्वस्थ झाले व आपणास काहीतरी धोका आहे असे जाणून त्यांनी ताबडतोब तेथून मुक्काम हलविला व वाईचे इलेक्ट्रिकल इंजिनियर श्री. देव यांच्याकडे ते गेले.

याच सुमारास भाई छन्नुसिंग पुण्याहून वाई येथे आले होते. त्यामुळे त्यांना भेटण्यासाठी आबा खात्रीने येथेच आले पाहिजेत असा पोलिसांनी कयास केला. त्यामुळे आबांचा कसोशीने तलाश लावण्याचा प्रयत्न सुरू झाला. पोलिसांनी सर्व कार्यकर्त्यांच्या हालचालीवर सक्त नजर ठेवली श्री. तात्या बोराटे हे भूमिगत कार्यकर्ते त्यावेळी फुलेनगर येथे होते. आबांनी बोराटेसह रात्री ७ वाजता वाई सोडावी असे निश्चित ठरले होते.

बरोबर ७ वाजता त्यावेळचे वाई तालुका काँग्रेसचे अध्यक्ष श्री. शंकरराव जेजुरीकर हे आबांना घेऊन जाण्यासाठी श्री. देव यांचेकडे येणार होते. सात वाजून गेले तरी ते येईनात. तेव्हा मात्र आबांना चिंता वाटू लागली. भूमिगतांच्या सर्व हालचाली घड्याळाच्या काट्यावर हुकूम चालत. कारण त्यांच्या दृष्टीने वेळेला फार मोल होते. ठरविलेले कार्य ठरलेल्या वेळेला झालेच पाहिजे असा त्यांचा कटाक्ष असे. काही धोका निर्माण झाला किंवा अन्य काही अडचणी आल्या तर उशीर होई. त्यामुळे ठरलेले कार्यक्रम भूमिगत एक मिनिटसुद्धा मागेपुढे होऊ देत नसत.

बरोबर सात वाजून पंधरा मिनिटांनी श्री. देव यांच्या घराचा मागचा दरवाजा ठोठावला गेला. कोणीतरी दार वाजवत आहे म्हटल्यावर आबांना पकडण्यासाठी पोलीस आले असावेत अशी देवांच्या घरच्या मंडळींची कल्पना झाली. त्यावेळी सर्वसामान्य जनतेला भूमिगत क्रांतिकारकांबद्दल अत्यंत आदर वाटत होता. आबा तर त्या भागातील क्रांतिकारकांचे डिक्टेटर होते. त्यांच्याबद्दल लोकात फार पूज्य भावना होती. त्यांच्यासारख्या एका महत्त्वाच्या माणसाला आपल्या घरात अटक व्हावी, असा थोर माणूस आपल्या घरात पकडला जावा याचे श्री. देव यांना अत्यंत वाईट वाटले. ही गोष्ट आपणास काळिमा आणणारी आहे असे त्यांना वाटून यातून कशी सुटका होईल असा विचार त्यांना पडला. आबा मात्र मुळीच डगमगले नाहीत. उलट बाहेर कोण आले असेल याचा अंदाज त्यांनी मनाशी बांधला व ते म्हणाले, 'तुम्ही बिलकुल घाबरू नका. बाहेर शंकरराव घाडगे आलेले आहेत' त्यामुळे धीर येऊन देव मंडळींनी दार उघडले आणि पहातात तो काय आश्चर्य, बाहेर खरोखर श्री. घाडगे उभे होते. आबांना सकाळी शंकरराव घाडगे भेटले होते व काही धोका असल्यास ते तसा निरोप देत असा आबांचा अंदाज होता. तो अचूक ठरला. शंकरराव घाडगे यांनी पोलीस तालकीजवळ आले असून ते देवांच्या घराची चौकशी करीत आहेत अशी बातमी दिली आणि आणखी पोलीस आणण्यासाठी लॉरी परत गेली आहे असेही त्यांनी सांगितले, हे ऐकल्यावर तर देवांच्या घरातीलसर्व मंडळींची पाचावर धारण बसली.

## आबांचा धीरोदात्त स्वभाव

परंतु जणू काहीच घडले नाही असा चेहरा करून अगदी शांतपणे आबा श्री. घाडगे यांना म्हणाले, 'काही हरकत नाही. पोलीसांची दुसरी लॉरी आल्यावर मला सांगा, मग पाहू.' श्री. घाडगे परत गेले परंतु अवघ्या पाच-सात मिनिटातच ते परत आले व पोलिसांची लॉरी पुन्हा आल्याची बातमी त्यांनी दिली. तेव्हा आबा तसेच उठले व श्री. देव यांच्या घरातून मागच्या दाराने बाहेर पळून श्री. घाडगे यांच्याबरोबर त्यांच्या घरी आले. तेथे आल्यावर त्या दिवसापुरती आपणास रहावयास जागा द्यावी अशी विनंती त्यांनी घाडगे यांना केली. परंतु एकंदर घडलेल्या घटनेने घाडगे अस्वस्थ झाले होते. पोलिसांच्या तडाख्यातून आपण बचाव करू असा विश्वास त्यांना वाटला नाही. 'उलट येथे मुळीच राहू नका व लवकरात लवकर बाहेर पडा' असे त्यांनी आबांना सांगितले तेव्हा 'मला रामडोहाकडे जाणारा बोळ दाखवा' असे आबा म्हणाले, तेव्हा श्री. घाडगे यांनी तो बोळ दाखविला. त्या बोळातून ते सरळ रामडोहाकडे गेले व तेथून ते नदीकडेने पंत सचीव विठ्ठल मंदिराच्या बोळातून सरळ मोती चौकात आले. वास्तविक त्यांच्या शोधात पोलीस असताना त्यांच्या समोरून छाती ठोकपणे जाणे म्हणजे जाणून बुजून संकटात उडी मारण्यासारखे होते. आबांच्यासारख्या असामान्य धडाडीच्या माणसांना असल्या गोष्टी म्हणजे विशेष नव्हत्या. आपल्याला हवा असलेला भूमिगत कार्यकर्ता आपल्या समोरून जाईल ही कल्पनाही नसल्याने पोलिसांना कसलाही संशय आला नाही.

त्याच दिवशी श्री. कापरे वकील यांचेकडे सत्यनारायणाची पूजा होती. या पूजेस आबा निश्चित येणार अशी वदंता असल्याने पोलिसांनी श्री. कापरे यांच्या घराला वेढा दिला. तिकडे शोधाशोध चालली असता, मोती चौकात रात्री ९ वाजताचा सिनेमा सुटून आठ-दहा माणसे फुलेनगरकडे चालली होती. आबा त्या मंडळीत घुसले व आपण सिनेमा पाहून परत निघालेल्या लोकांपैकीच एक आहोत असे दाखवून ते फुलेनगरकडे पोलिसांच्या पुढ्यातूनच गेले. फुलेनगरपर्यंत सोबत करण्याचे काम भिलारे गुरुजी (जिल्हा काँग्रेस कमिटीचे हल्लीचे अध्यक्ष) यांनी केले.

## देवांचा देवपणा

इकडे आबा गेल्यावर पाचदहा मिनिटांच्या आतच पोलिसांचा वेढा श्री. देव यांच्या घराला पडला. कसून शोध सुरू झाला. इतके पोलिस असून एकदम घरात घुसण्याचे कोणाही पोलिसाचे धाडस होईना. आबा देवांचे घरातून निघून गेल्यानंतर आपल्याविषयी कसलाही संशय येऊ नये म्हणून श्री. देव मुद्दाम दहाच्या सिनेमाला निघून गेले. पोलीसांनी दार ठोठावले पण देवांच्या बायकोने घरात मालक नाहीत मी दार उघडत नाही असे सांगितले. तेव्हा पोलिसांचा संशय अधिकच बळावला. त्यांनी चोहोबाजूंनी कडेकोट बंदोबस्त ठेवला. शेवटी देव आले. त्यांनी काय चालले आहे? माझ्या घरात कोणीही नाही. आपण घरात येऊन पाहू शकता असे सांगितले पण पोलिसांचे घरात शिरण्याचे धाडस झाले नाही. उलट आठ दहा पोलिसांनी बंदुका सज्ज करून जेथे आबा लपले असावेत असे त्यांना वाटले तेथे बाहेरूनच 'तू बाहेर ये, नाहीतर तुला गोळी घालू' अशी दमदाटी केली. तेथे इतके शिपाई असून व त्यांच्या हातात बंदुका असून बेधडक आत घुसण्याची त्यांची हिंमत झाली नाही. ते पुन्हा पुन्हा दाराशी जात व बाहेरून बंदुका रोखून इशारा देत. आबांसारखा क्रांतिवीर नि:शस्त्र असणार नाही व न जाणो त्यांच्या जवळ बंदूक असली तर? ते आपणास नक्कीच पाणी पाजतील असे वाटून ते बेहिंमत शिपाई आत जाण्यास कचरू लागले. शेवटी ते सर्व पोलीस श्री. देव यांच्या घरात शिरले व सर्व वस्तू त्यांनी उचकटून आबांचा तपास चालविला. इतके करूनही त्यांचे समाधान झाले नाही. घराच्या एका कोपऱ्यात एक गादीची वळकटी उभी करून ठेवलेली होती. तिला पाहताच त्यात आबा दडून बसलेले असावेत अशा कल्पनेने त्यांनी त्या गादीवर संगिनी रोखल्या परंतु ती गादीच होती वीर नव्हते. ते केव्हाच पसार झाले होते.

इकडे फुले नगरात आबा श्री. जमदाडे यांचेकडे गेले. तेथे श्री. पांडु-तात्या बोराटे होते. परंतु त्यावेळी भूमिगतांना आसरा देणारी माणसेही इतकी तयार झालेली होती की सहजासहजी ती दुसऱ्या माणसाला त्यांचा

पत्ता लागू देत नसत. घरातल्या एका म्हाताऱ्याने श्री. जमदाडे बाहेर गेले असल्याचे सांगितले, पण आबा म्हणाले, 'ठीक आहे मी आजच्या पुरता येथे राहतो, उद्या उठून दुसरीकडे जाईन.' तेव्हा त्याना आत प्रवेश मिळाला. नंतर त्या स्त्रीने जमदाडे जेथे होते तेथे नेऊन त्या नवख्या इसमाची हकीकत सांगितली. तेव्हा जमदाडे आबांच्या जवळ आले व त्यांनी श्री. बोराटे यांची भेट घालून दिली. नंतर आबा व बोराटे पहाटे उठून कवठेमार्गे करंजखोपकडे निघून गेले.

१९४२ च्या चळवळीत क्रांतिकारकांना जनतेचा जो उत्स्फूर्त पाठिंबा मिळत होता त्याचे दुःख सरकारधार्जिण्या मूठभर लोकांना होणे सहाजिकच होते. क्रांतिकारकांचे मुख्य स्फूर्तिकेंद्र अशा सातारा शहरातच असा एखादा समारंभ घडवून आणावा की त्यामुळे ब्रिटिश सरकार आणि सामान्य जनता या दोघांनाही नोकरशाहीच्या कर्तव्यदक्षतेची खात्री पटावी आणि सातारा जिल्ह्यातील क्रांतिकारकांच्या कार्याला तोंड देण्यास जिल्ह्यातील सरकारी शासन समर्थ आहे हे सिद्ध व्हावे असे या लोकांना वाटत होते.

## सेवानिवृत्त सैनिकांच्या सत्काराचा बेंडबाजा

त्यामुळे त्यावेळचे मुंबई इलाख्याचे गव्हर्नर लॉर्ड कोलव्हील यांच्या अध्यक्षतेखाली सातारा जिल्ह्यातील सेवानिवृत्त सैनिकांचा सत्कार करण्याचा एक खास कार्यक्रम वरील ब्रिटिश धार्जिण्या लोकांनी आखला. या सेवानिवृत्त सैनिकांपैकी काहींचा गौरव करून त्यांना गव्हर्नर साहेबांच्या हस्ते काही पारितोषिके देण्याचे ठरले. साताऱ्च्या राजवाड्यातच हा कार्यक्रम घडवून आणावा म्हणजे भूमिगतांचा दबदबा कमी होईल व या सैनिकांचे आणि त्यांच्या कुटुंबियांचे सहाय्य भूमिगतांना मिळणार नाही व सहाजिकच हा कार्यक्रम यशस्वी झाला की सरकारी यंत्रणेचा सर्वसामान्य लोकात वचक बसेल अशी यामागील भूमिका होती.

ही बातमी क्रांतिकारकांच्या कानावर गेली. प्रथम श्री. पांडुतात्या बोराटे व श्री.. डी. जी. देशपांडे यांना ही बातमी समजली. हा समारंभ म्हणजे भूमिगतांच्या आणि क्रांतिकारकांच्या चळवळीला एक शहच असून

कोणत्याही परिस्थितीत हा कार्यक्रम यशस्वी होऊ द्यावयाचा नाही असे त्यांनी ठरविले. उलट ही आयती संधी चालत आली असून या निमित्ताने गव्हर्नर साहेबांना क्रांतिकारकांच्या सामर्थ्याची चुणूक दाखविली पाहिजे. या भूमिगतांजवळ शस्त्रास्त्रे आणि दारूगोळा यांचा बराच साठा असून या चळवळीची पाळेमुळे फार खोल गेली आहेत, असे भासविले पाहिजे आणि हा कार्यक्रमच उधळून लावावा असा शहाला काटशह देण्याचे त्यांनी ठरविले.

भूमिगतांनी बॉम्ब आणावा व तो गव्हर्नरसाहेबांच्या गाडीखाली उडवून त्यांना व या इंग्रजधार्जिण्यांना चांगलीच अद्दल घडवावी असा बेत आबासाहेबांनी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी रचला. त्याचबरोबर काही प्रेशर टिकल्याही मिळविण्याचे ठरले. या टिकल्यांचे वैशिष्टय असे की साध्या बुटाच्या टाचेखाली जरी एखादी प्रेशर टिकली चिरडली गेली तरी तिचा स्फोट होऊन दोन चार लोक जखमी होत असत. भूमिगतांना मोसंब्याच्या आकाराचा प्रेशर बॉम्ब आणि काही प्रेशर टिकल्या मिळाल्या.

या प्रेशर टिकल्या आणि प्रेशर बॉम्ब मिळविण्यासाठी सर्वश्री तात्या बोराटे आणि डी. जी. देशपांडे यांना कोल्हापूर येथे जावे लागले. प्रेशर बॉम्ब आणि टिकल्या घेऊन रेल्वेने प्रवास करणे त्या काळात सोपे नव्हते. तो काळच मुळी संशयाचा होता. असे साहित्य घेऊन प्रवास करीत असताना क्रांतिकारकांना नेहमीच कसल्या ना कसल्या तरी अडथळयांना तोंड द्यावे लागत असे.

## साहसी योजना

कोल्हापूरहून परत येत असताना कोणालाही आपल्याजवळ प्राणघातक साहित्य आहे असा संशयसुद्धा येऊ नये अशी दक्षता वरील क्रांतिकारकांनी घेतली. त्यांनी प्रेशर बॉम्ब व टिकल्या साध्या पिशवीत ठेवल्या व थोडी संत्री व मोसंबी खरेदी करून ते सर्व साहित्य एकत्र मिसळून ठेवले. बॉम्बचे स्वरुप व आकार मोसंब्यासारखेच असल्याने व ही पिशवी ते उघडउघड जवळ बाळगत असल्याने सहजासहजी त्याचा कोणालाही संशय येणे शक्य नव्हते. ही पिशवी घेऊन श्री. पांडुतात्या बोराटे व श्री. डी. जी. देशपांडे

रेल्वेच्या डब्यात बसले. योग असा की गाडी सुटण्याच्या पाच मिनिटांचा अवकाश असताना त्या रेल्वे गाडीला पोलिसांचा वेढा पडला. प्रत्येक प्रवाशाची कसून झडती सुरू झाली. प्रत्येकाचे सामान तपासले जाऊ लागले. हे काम झाले ? आपणाविषयी ह्या पोलिसांना काही सुगावा तर लागला नसेल ना ? असे वाटून ते दोघेजण फळांनी भरलेली ती पिशवी घेऊन खाली उतरले आणि त्यांनी ह्या वेढ्याचे काय कारण आहे ? असे त्या पोलिसांनाच विचारले. तेव्हा बराचसा बेकायदा साखऱ्या काळाबाजार करण्यासाठी नेला जात असल्याची बातमी लागली असून तो ताब्यात घेण्यासाठी हा वेढा असल्याचे उत्तर पोलिसांनी दिले. तेव्हा हे प्रेशर बॉम्ब असलेली पिशवी त्यांच्यासमोर धरून ही तपासा, आम्ही फळे घेऊनच चाललो आहोत, अशी पोलिसांना विनंती केली. तेव्हा आपणासारख्या उतारूंना त्रास देण्याचा आमचा इरादा नाही. आपण खुशाल प्रवास करा असे पोलिसांनी त्यांना सांगितले. स्वाभाविकच निश्चित मनाने ती पिशवी घेऊन ते दोघेजण गाडीत बसले. त्यांच्या पुढील प्रवासात नंतर कोणताही त्रास झाला नाही.

एकसळ येथे आल्यानंतर बॉम्बस्फोट केव्हा व कशा रीतीने करावयाचा यासंबंधी बैठक घेण्यात आली. अर्थातच हा बॉंब उडविण्यात घातपाती साहित्य भूमिगतांजवळ आहे आणि या चळवळीचे स्वरूप साधे नाही याची खात्री खुद्द गव्हर्नर साहेबांनाच पटावी आणि पुढील सरकारधार्जिणा कार्यक्रम रद्द व्हावा हा हेतु होता.

नंतर हे साहित्य एकसळ येथे भूमिगतांच्या ताब्यात आल्यानंतर सातारा येथे जाऊन आबासाहेबांनी गव्हर्नर साहेबांच्या कार्यक्रमासंबंधी तपशीलवार माहिती मिळवावी असे ठरून त्याप्रमाणे आबासाहेबांनी श्री. मनोहरपंत भागवत वकील यांच्याकडून सर्व माहिती मिळविली. या दौऱ्यात गव्हर्नरसाहेब साताराटोडला जाणार आहेत, अशी निश्चित माहिती मिळविल्यावर सातारा रोडच्या खिंडीत तो बॉम्ब पुरण्याचे ठरले. या सर्व साहसी उपक्रमाचे नेतृत्व दे. भ. आबासाहेबांकडे होते. परंतु प्रत्यक्ष बॉम्ब पुरण्याच्या मोहिमेत त्यांनी भाग घेऊ नये तर सातारा शहरात राहून

सातान्यातील हालचालींकडेच बारकाईने लक्ष द्यावे असे ठरले व सर्वश्री डी. जी. देशपांडे, पांडुतात्या बोराटे, कासेगावकर वैद्य यांनी रात्री नऊच्या सुमारास सातारारोड खिंडीत जाऊन तो प्रेशर बॉम्ब पुरावा असे ठरले.

त्याप्रमाणे ठरलेल्या वेळी या तिघांनी त्या खिंडीकडे कूच केले. खिंडीतील वळणावर कोणत्या ठिकाणी गाडी आली असता तिच्या टायर-खाली बरोबर बाँब सापडून स्फोट होईल याचा अंदाज घेऊन बरोबर त्याच जागी खड्डा घेण्यात आला. परंतु ते बॉम्बची बटनपीन काढण्याचा प्रयत्न करू लागले असता ती पीन कशी काढावी याची अचूक माहिती तिघांपैकी एकालाही नसल्याने त्यांच्यापैकी कोणालाच बटनपीन काढता यईना. बटनपीस निघाल्याखेरीज बॉम्बस्फोट होणे शक्य नव्हते. सारा बेत ढासळण्याची पाळी आली.

परंतु आता जर माघार घेण्यात आली तर प्रतिस्पर्ध्यांचा डाव यशस्वी होईल व आपली सारीच मेहनत वाया जाईल हे क्रांतिकारकांच्या लक्षात आले व निदान आपण हे घातपाती साहित्य मिळवू शकतो व गव्हर्नरच्या गाडीखाली बॉम्ब पुरण्यापर्यंत तरी भूमिगताची मजल पोहोचली आहे हे ब्रिटिश सत्ताधाऱ्याना कळून चुकेल असे वाटून सहज सापडेल अशा रीतीने जागा उकरून तो बॉम्ब ठेवण्यात आला व सबंध रस्त्यावर प्रेशर टिकल्याही टाकण्यात आल्या. प्रत्यक्ष जेथे कार्यक्रम होणार होता त्या राजवाड्याच्या दाराजवळही काही प्रेशर टिकल्या टाकण्यात आल्या.

गव्हर्नरसाहेबांची गाडी जाण्यापूर्वी तो मार्ग सुरक्षित आहे? याची खात्री करून घेण्यासाठी मिलिटरी पायलट गाडीकडून आधीच तपासणी केली जाई. त्याप्रमाणे पायलटकारने रस्त्याची पाहणी करताना त्यांना खिंडीत रस्त्याच्या मध्यभागी काहीतरी खणलेले आढळून आले म्हणून तो खड्डा उकरून पाहताच त्यांना प्रेशर बॉम्ब आढळून आला. पोलिसांच्या तोंडचे पाणी पळाले. त्या खड्ड्याच्या आसपास काही प्रेशर टिकल्याही आढळून आल्या. तेव्हा तर ह्या घटनेने अधिकच भीती निर्माण झाली. पोलिसांनी व मिलटरीने सातारा राजवाड्यापर्यंतचा रस्ता दुर्बिणीचे साहाय्याने तपासला. खिंडीत मिळालेला प्रेशर बॉम्ब एका पाण्याच्या

पातेल्यात ठेवून तो संशोधनासाठी पुण्यात पाठविण्यात आला. खुद्द ज्या राजवाड्यात हा कार्यक्रम होणार होता त्या राजवाड्याचे दाराशीच टिकल्या सापडल्या म्हणून ताबडतोब सातारा जिल्ह्यात गव्हर्नरसाहेबांचा सर्व कार्यक्रम रद्द करण्यात आला. अर्थात पेन्शनर सैनिकांचा गौरव करून त्यांच्यामध्ये व भूमिगत कार्यकर्त्यात बेबनाव घडवून आणण्याची ब्रिटिश-धार्जिण्या लोकांची कल्पनाही बारगळली.

अशा तऱ्हेने प्रेशर बॉम्ब व प्रेशर टिकल्या मिळवून खुद्द आपल्या गाडीवर हल्ला करण्याइतके सामर्थ्य भूमिगताजवळ आहे याची माहिती खुद्द गव्हर्नर कॉलव्हील यांना मिळून सातारा जिल्ह्यातील भूमिगतांच्या चळवळीने किती उग्र स्वरूप धारण केले आहे याची कल्पना त्यांना आली.

शहाला प्रतिशह रचून आणि प्रतिस्पर्ध्यांच्या डावाला बळी न पडता तो यशस्वीपणे उधळून लावण्याच्या कामी भूमिगतांनी मिळविलेले यश पाहता आबाहेबांचे अशा प्रसंगी होणारे मार्गदर्शन कसे समयसूचक आणि नेटके होत असे याची थोडीफार कल्पना वरील घटनेवरून येऊ शकेल.

## तूफान सेनेची स्थापना

या वरील घटनेमुळे भूमिगतांचा आत्मविश्वास बळावला. त्यांनी भूमिगतांची संघटना प्रबळ करण्यासाठी तूफान सेनेची स्थापना केली. तूफान सेनेचे केंद्र त्यावेळी कुंडल येथे होते. तेथे ही सेना शिकवून तयार करण्याचे तसेच त्याना बौद्धिक शिक्षण देण्याचे वर्गही चालविण्यात येत होते. ह्या शिक्षण वर्गास आबांनी आपल्या गावचे (कवठे येथील) रघुनाथ डेरे (हल्लीचे तालुका काँग्रेसचे अध्यक्ष) व शंकरराव डेरे यांना पाठविले होते. ह्या तूफान सेनेतील सैनिकांची परीक्षा घेण्यात येत असे. परीक्षापद्धत फार निराळी होती. जी. डी. लाड हे परीक्षक होते. त्यांच्या हातात डोक्याइतक्या उंचीची एक काठी होती व ती काठी सैनिकांचे पाठीवर ते फिरवून मारीत असत. जर त्यांचे नीतीधैर्य खचले तर तो नापास होय. पण ज्याच्या चेहऱ्यावर कसलाही बदल झाला नाही तो पास. अशी कसोटी घेतली गेली. ह्या परीक्षेपूर्वी गोंदा ह्या ताकारी स्टेशन शेजारच्या गावातून एक मिरवणूक

काढण्यात आली. ही मिरवणूक दीड मैल लांबीची होती. मिरवणुकीच्या अग्रभागी तूफान सेना बंदुकांची सलामी देत चालली होती. मिरवणुकीचा शेवट एका विराट सभेत झाला. त्या सभेस १० ते १५ हजार लोक जमले होते. ह्या मिरवणुकीत रथात आबा होते व सभेचे अध्यक्षस्थानही आबांनीच भूषविले होते. त्या सभेत सर्वश्री नाथाजी लाड, उत्तमराव पाटील, धुळे व जी डी. लाड यांची भाषणे झाली. ह्या सर्व वक्त्यांनी भूमिगत चळवळीची भूमिका विशद करून सांगितली. ह्या सभेची बातमी रेठरे येथील दोन पोलिसांना समजली तेव्हा ते सभास्थानी येताच त्यांना अटक करण्यात आले. सभा संपल्यानंतर भूमिगत आपापल्या नियोजित ठिकाणी निघून गेले व त्यानंतर कराड येथे पोलिसांना ही बातमी समजली. त्यांच्या लॉऱ्या सुटल्या पण हाती काही लागले नाही. त्यांचे कार्य बैल गेल्यानंतर झोपा केल्यासारखे झाले.

## किसन वीरांना पकडण्यासाठी ५ हजारांचे बक्षीस

ही चळवळ आता पोलिसाचे आटोक्याबाहेर गेली आहे, असे पाहून सरकारने गिलबर्ट (सिंधमधील होरांचे बंड मोडणारा प्रसिद्ध) डी. एस. पी. व लष्कराला पाचारण केले. भूमिगतांना पकडण्यासाठी जंग जंग पछाडले. खुद्द आबांना पकडण्यासाठी सरकारने ५ हजारांचे बक्षीस जाहीर केले होते. पोलिसांच्या छळास सामान्य जनता त्रासली होती. लोकांना संशयावरून सारखी मारहाण चालू होती. अशा परिस्थितीत सातारा जिल्ह्यात राहणे हे धोक्याचे आहे असे पाहून त्यांनी हा जिल्हा सोडून जिल्ह्याबाहेर काही दिवस मुंबईसारख्या ठिकाणी जाण्याचा निर्णय घेतला. जिल्ह्याच्या बाहेर जावयाचे म्हणजे त्यावेळी फार खर्चाचे होते. जिल्ह्यात असताना भूमिगतांना जेवणखाण, कपडालत्ता ह्यासाठी खर्च करावा लागला नव्हता. पण जिल्ह्याबाहेर पैशाशिवाय चालणार नाही, याची त्यांना जाणीव होती. म्हणून भूमिगतांना खर्चासाठी काही सधन व्यापारी व शेतकरी लोकांनी स्वयंप्रेरणेने आर्थिक मदत केली.

## रिलीफ फंड कमिटीची स्थापना

भूमिगत हे वनवासी रामलक्ष्मणाप्रमाणे सर्व त्रास आपल्यासमोर असलेल्या उच्च ध्येयासाठी सहन करीत होते. परंतु उर्मिलेप्रमाणे दु:खाचे खाईत जळण्याचे काम भूमिगतांचे कुटुंबीय मंडळींना करावे लागत होते. रात्रंदिवस पोलिसांचा ससेमिरा पाठीमागे होता. कारणाशिवाय अन्नपाण्यावाचून पोलीस स्टेशनवर दोन दोन तीन तीन दिवस रखडावे लागत होते. लाज झाकण्याइतकेही वस्त्र मिळत नव्हते. पोलिसांच्या भीतीने इतर लोक उघडपणे मदतही करू शकत नव्हते. अशा वेळी मुंबईस वैकुंठलाल मेहता यांच्या अध्यक्षतेखाली रिलीफ फंड कमिटी स्थापन झाली व त्या कमिटीमार्फत भूमिगतांचे कुटुंबियांना थोडेसे नाममात्र जीवनवेतन देण्यास सुरूवात झाली. हे जीवनवेतन देण्याचे काम करीत असताना डी. जी. देशपांडे यांना पोलिसांनी कुमठे येथे पकडले व शेवटी पोलिसांची डी. जी. नी खात्री करून दिल्यानंतर पोलिसांनी त्यांना योग्य तो पाहुणचार देऊन त्यांची मुक्तता केली. ह्याच वेळी नांदगाव येथे २०० पोलीसांनी छापा घालून त्यात बाबुराव घोरपडे व त्यांचे बंधु बाळकृष्ण घोरपडे, भगवंतराव कदम वगैरे भूमिगतांना पकडून कोरेगाव जेलमध्ये ठेवले. त्यामुळे दोन महिने त्या भागात पोलीसांच्या दृष्टीने काही गडबड झाली नाही, पुष्कळशी शिथिलता आली.